म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2345



# शब्द झाले सूर

REFBK-0022334
REFBK-0022334

- माधव निमक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3 DEC 1976

(कृ.मा.प.)

काव्य
२१४ भ
२२३३४
२१५८
२३७५

# शब्द झाले सूर !

REFBK-0022334
REFBK-0022334

कवी : श्री. माधव व्यंकटेश निमक
बी. ए. बी. कॉम.
७१४ बुधवार, पुणे २.

मूल्य ६ रुपये

प्रकाशक :
सौ. सुनीता मा. निमक
७१४ बुधवार, पुणे २.

सर्वहक्क :
श्री. मा. व्यं. निमक

मुद्रक :
अनमोल मुद्रणालय
३८३ ब शनिवार पेठ,
पुणे ३०.

मुखपृष्ठ :
प्रा. भय्यासाहेब ओंकार
४९५ शनिवार, पुणे ३०

**गीत शृंगार प्रकाशन**

**प्रसिद्धी अक्षय्य तृतीया**
**१० मे १९७८**



" ॐकारातुन स्फूर्ति द्यावी गणेश देवा मला,

ॐकारासम आकार द्यावा मम काव्यांच्या फुला !

ॐकारापरि भाव स्फुरावा, शब्द सुचावा मनी

ॐकारातुनि आशिष द्यावे, धन्य करा लेखणी ! ! "

**माधव निमक**

# महाराष्ट्राचे थोर साहित्यिक मानयीय श्री. गो. नी. दांडेकर यांची प्रस्तावना

रसास्वाद हा मोठ्या संपन्न रुचीचा विषय आहे. रसिक साहित्यनिर्माता कवि सर्वच स्वच्छंद विहार करू शकतात. रस कोणालाच उणे दुणे म्हणत नाही, की आपल्या क्षेत्रात प्रवेश नाकारीत नाही.

इथून पुढे मात्र कवींची आणि साहित्यकारांची वाट निराळी फुटते. रसिक रसाला लोभावून मागे रेंगाळतात, तर साहित्यिकार कवि रसापासून स्फूर्ति लाभून अतिशय वेगाने पुढे झेपावतात.

सामान्यांना जाणवत नाही, ते या असामान्यांना तीव्रतेने आकळू लागते. आकाशातून उडणाऱ्या एखाद्या बगळ्यांच्या थव्यांमध्ये सामान्यांना केवळ बगळेच दिसतात तर कवीला वाटते की, कुण्या अलौकिक चित्रकाराने पांढऱ्या शाईत आपला कुंचला बुडवून आकाशभर ही धवलरेखा चितारली आहे. हेच कवींचे वेगळेपण !

मित्र श्री. निमक यांचा 'शब्द झाले सूर' हा कवितासंग्रह सहज चाळतांना देखील ध्यानी येते की, निमक या वेगळ्या पंथाचे वारकरी आहेत.

सुरांनी झपाटलेले हे मूल पुढे बालकवींच्या झोतात गवसले, अचानक यालाही जाणवू लागले की, आपणास काही निराळे स्फुरते आहे. इतरांना दिसणारे ते हे नव्हे. हे त्याहून वेगळे, विस्मयकारक, वेड लावणारे आहे. आणि तिथून पुढची निमकांची वाटचाल 'शब्द झाले सूर' मध्ये स्पष्टपणे प्रत्ययास येते.

सुमारे त्रेपन्नच्या सुमारास निमक काव्य लिहू लागले. कदाचित काही ओळी त्यांस त्यापूर्वीही स्फुरल्या असतील. पण या संग्रहात त्या सुमाराची कविता आहे, 'आश्विनी पौर्णिमा' जशी इतर कवींची या दिशेने वाटचाल

सुरू होते, तशी निमकांचीही झाली आहे. त्यांना वाटते की, वृक्ष लतांचे चुंबन घेऊ लागले, तो त्या लाजल्या. त्या लज्जेचे मूर्त रूप म्हणजे दवबिंदू ! असेच पुष्कळसे !

महानदीचे उगमस्थलीही असाच एखादा झरा असतो. खळखळणारा, फेसाळणारा, खूप गतिमान. पुढे त्याचे स्वरूप स्थिरावते, आणि पात्रही विस्तारते.

'निसर्ग गूढता', 'कुठे धावते', 'देवा तुझी सांजवात', 'तुझी जनी ही तुलाच देवा'– या कविता म्हणजे कवितेच्या प्रसदखुणा आहेत. कविता देवी आपले हे देणे मुक्त मनाने वाटीतच असते. घेणाराचे पात्र कितपत धड आहे, यावर सगळे अवलंबून असते.

कै. अत्र्यांचे निधन, चंद्रावर मानवाचे पहिले पदक्षेपण, एकाहत्तरचे युद्ध, मुंबईचा फटका, दर्या गीते, ही आहेत कवीला या प्रवासामध्ये लागलेली बंदरे. यापैकी कुठे कवि क्षणभर थबकला आहे, विव्हल झाला आहे, आंसवे ढाळतो आहे, डोळे मिचकावून थट्टा करतो आहे, असे नाना परींचे.

कविता म्हणजे काय याचे कवीला भान आहे. ते मनाच्या गाभाऱ्यातील स्पंदन आहे. सरस्वतीचे शब्दांतले कोरीव पाऊल आहे. हे कवीला ठावकी आहे. भावनांच्या आणि कल्पनांच्या मंजिऱ्या फुलविण्यासाठी तो कवितेला आवाहन करीत आहे.

आणि मुख्य तथ्य असे की ज्या बालकवींच्या टवटवीत कवितेच्या प्रसादाने आपला शारदामंदिरी प्रवेश होऊ शकला, त्यांचे विषयींच्या कृतज्ञतेने कवींचे मन दरवळते आहे. तो म्हणतो,

रात्रीही उठतो नभात बघतो त्या दूरच्या चांदिण्या
माझ्या मी हृदयी कळून चुकतो त्वत पाउलांच्या खुणा ॥

ही कृतज्ञता कवीची साथ करीत असली की मग त्याला उन्मार्गगामी होण्याचे भय नाही.

इति

**आप्पा दांडेकर**

# अनुक्रमणिका


| | पान | | पान |
|---|---|---|---|
| ॐकार स्तवन | ३ | लहान मानव महान आहे ! | ३४ |
| श्री. गो. नी.दांची प्रस्तावना | ४ | मज याद आज यावी ! | ३५ |
| प्रेरणेकडून प्रकाशाकडे | ६ | तांडेला रं हाकार नाव ! | ३७ |
| पुरस्कार | ९ | इतिहासाची रंगव पाने. | ३८ |
| बालकवींच्या चरणावर | ११ | ही प्रीत जागवावी ! | ३९ |
| मला वाटते ! | १२ | सज्ज आहे हिंदुस्थान ! | ४० |
| आवाहन ! | १३ | जाऊं नको तूं मुंबईला ! | ४१ |
| कशी होते कविता ? | १४ | सोड माझी वाट ! | ४२ |
| कविता म्हणजे ? | १५ | कुणी कुणाचे नाही ! | ४३ |
| आश्विनी पौर्णिमा | १६ | जाऊ नको तूं कान्हा ! | ४४ |
| स्वप्नाङ्गना | १७ | सांगू नको हे तू कुणा ! | ४५ |
| निसर्ग गूढता ! | १८ | फिके पडेल चांदणे ! | ४६ |
| भाऊबीज | १९ | ये गोपाळा ! | ४७ |
| कुठे धावते ? | २० | उठा बाळ राजे जाहली सकाळ. | ४८ |
| केव्हा ? | २१ | जा माणसा जा एकला ! | ४९ |
| देवा तुझी सांजवात ! | २२ | माझी नाव रे ! | ५० |
| आई तुझ्या आवरी आसवाला | २४ | अधरी धर तूं पावा ! | ५१ |
| पायदळीची फुले ! | २५ | विठू नाम ऐका ! | ५२ |
| " तुझी जनी ही तुलाच देवा– | २७ | प्रीत दाटली उरी ! | ५३ |
| दाखवा तीच पुन्हा पाऊले ! | २८ | तूंच जाण भाव मनीचे | ५४ |
| लक्ष्मणाची सती उर्मिला ! | २९ | परिही तुला न कळले ! | ५५ |
| शोधू कुठे माधवा, तुला मी ! | ३० | कोडे मनिचे उलगडले. | ५६ |
| जसे फुलावे ! | ३१ | विरह छेडु दे तुझीच गाणी | ५७ |
| प्रणयिनी ! | ३२ | माझ्या माहेरच्या पोरी ! | ५८ |
| प्रियतम माझ्या प्रल्हादाला ! | ३३ | अधुरे गीत ! | ५९ |

| | पान | | पान |
|---|---|---|---|
| सृष्टि तुझा सन्मान ! | ६० | हितोपदेश. | ८४ |
| मिटा पापण्यांनो | ६१ | हेटाळणी | ८५ |
| चांदण्यानी कां जमावे ! | ६२ | मुरली ! | ८६ |
| सांग कधी येणार ? | ६३ | टिपरी ! | ८७ |
| घे तू हरिचे नाम. | ६४ | क्रांती ज्वाला ! | ८८ |
| कारभारी. | ६५ | खन्त. | ८९ |
| कोल्याची लेकं मी चालले. | ६६ | पहिला पाऊस ! | ९१ |
| मन. | ६७ | नर्तकी | ९२ |
| हिरवे गाणे | ६८ | रिताकिनारा ! | ९३ |
| दर्शन दे तरी ! | ६९ | चिमण्याची आळवणी | ९४ |
| प्रेयसीस विनंती ! | ७० | पहाटेचा शहारा. | ९५ |
| प्रतिक्षा | ७१ | कै. वि. स. खांडेकरांना मृत्यूची श्रद्धांजली. | ९६ |
| शृंगार | ७२ | जवळ ये प्रणयिनी ! | ९७ |
| हळू हळू टाक ! | ७३ | गीत हे उमलून दे ! | ९८ |
| देवा तुझे नाम चांगले चांगले ! | ७४ | भास. | ९९ |
| मातीचे पुतळे | ७५ | जीवनाचे धागे. | १०० |
| ओठा मधले गीत टिपाया. | ७६ | खुळ्याची मागणी. | १०१ |
| बक्षीस ! | ७७ | मयूर नर्तन. | १०२ |
| काय पुसता मला सारखे ? | ७८ | मी कवी होणार आहे ! | १०३ |
| कलिकेची विनंती. | ८० | निसर्गा तूच खरा ईश्वर | १०४ |
| झोका ! | ८१ | माझ्या खुळ्या सुरांनो ! | १०६ |
| शामसखे मज दिसला नाही. | ८२ | संपत आली वात. | १०७ |
| भ्रमाचा भोपळा ! | ८३ | रम्य पहाट. | १०८ |

# कृतज्ञता

माझा "शब्द झाले सूर !" हा गीत काव्य संग्रह प्रकाशित होण्यास कविवर्य सुधांशू, ती. रा. रा. गोपीनाथ तळवलकर, श्री. गो. नी. दांडेकर, प्रा.भय्यासाहेब ओंकार, कै. ग. दि. माडगूळकर, श्री. अ. दि. कोकड व श्री. एस्. जी. ओझे यांचे बहुमोल मार्गदर्शन व आशीर्वाद लाभले. ह्या सर्वांचा मी अतिशय ऋणी आहे.

तसेच माझ्या काही कविता रविवार सकाळ, स्वराज्य, रोहिणी, रागिणी, कायस्थ प्रबोधन, अमरेन्द्र प्रेरणा, रेवती वगैरे साप्ताहिके व मासिके यांनी प्रसिद्ध केल्या. त्याबद्दल मी त्यांचा पण फार आभारी आहे.

अनमोल मुद्रणालयाचे श्री. परभाणे बंधू ह्यांनी माझे मुद्रणाचे काम सुबक व थोड्या दिवसात छापून देऊन मला उपकृत केले.

धन्यवाद !!

आपला नम्र

**माधव व्यं. निमक**

# प्रेरणेकडून प्रकाशाकडे

रसिकांनो,

हा माझा पहिलाच काव्यसंग्रह ! पहिलंच अपत्य ! आईला पहिल्या बाळाबद्दल, झाडाला पहिल्या पानाबद्दल, भूमीला पहिल्या पावसाबद्दल जी ओढ, जी अपूर्वाई अन् जे कौतुक असतं तेच मला ह्या काव्यसंग्रहाबद्दल आहे !

नाना व्यक्ति नाना रंग, नाना ढंग, नाना छंद ! मला आनंद गवसला गाणं जुळवून गाण्यात नि ते गुणगुण्यात ! सहजी पोटातून ओठावर ते येत होतं. होतं ते सारं नकळत होतं; त्या शब्दांना वृत्त, गण, मात्रांची चौकट घालीत बसणं मला जमलं नाही, अगदी हृदयाच्या आतल्या पडसादांनी अन् उर्मींनींच त्याला वळण लावलं, रूप दिलं, रंग दिला, आकार अन् गंध दिला !

ह्या कवितांची प्रेरणास्थाने खूप होती ! अगदी खूप लहानपणी जुन्नरच्या उघडचा हिरव्या मस्त वावरात, पिकांनी डोलणाऱ्या समृद्ध शेतात, सुगीत घालवलेले दिवस ! नंतर पुण्याला आल्यावर पर्वतीच्या मागच्या ओढ्याची खळखळ, पहाटेच्या वेळी आईने गोड आवाजात म्हटलेली ओवी, भजने, वडिलांची जुन्या रागदारी नाटकातील गाण्याची आवड ! ११-१२ व्या वर्षी बेहोष होऊन सुदर्शन मेळ्यात गायलेली गाणी –ते बिल्ले –ती बक्षिसे ! श्री गजाननराव वाटवे, बबनराव नावडीकर, सुधीर फडक्यांची भावगीते ! नव्हे तमाशातल्या गोंधळात, रस्त्यावरच्या भिकाऱ्याच्या गाण्यात सुद्धा कुठेतरी सूर गवसत होता. सौ. माणिक वर्मा, हिराबाई बडोदेकर, भीमसेन जोशी यांच्या सुरात

रंगलेल्या अनेक रात्री कधी एकेकाळी ऐकलेल्या गझली, कव्वाली साऱ्या मनात रुजत होत्या, प्रक्रिया करीत होत्या !

पुढे रा. श. वाळिंब्यांनी शिकविलेल्या बालकवींच्या कवितेने मी अक्षरश: वेडयासारखा झपाटलो गेलो. त्या कवितेच्या तालावर मी डोलू लागलो. तिच्यात मृदुमोरपीसासारखी एक विलक्षण अनामिक जादू होती. तिने मी भारला गेलो. मोहरून गेलो, तिने मला लय दिली. ताल दिला; स्वप्नावर जगायला शिकवलं, एका वेगळया नाजूक, गोड जगात नेलं !

जीवनाचे अनेक रंग मी जवळून न्याहाळलेत. प्रेम केले, संसाराचे चटके सोसले; प्रत्येक वेळच्या अनुभवाची चव खूप वेगळी होती. हे सारे सोसताना मी एकटा होतो. नि म्हणून डोळयांच्या शिंपल्यातून ओघळलेले आसू एकटया पापण्यांनी टिपले; जे ओघळले ते–ते सूर झाले –गीत झाले ! अगदी अलगद अन् नकळत ! म्हणून काळजाला घर पाडणारी हुरहूर, काळजी, दु:ख मला लोभस, अन् हवसं वाटतं. जवळचं अन् आपलंस वाटतं झपाटतं– शब्द देतं–मनात कोंडलेल्या भावनांना गती देतं– गीत देतं ! वेड लावतं !

जगाच्या या विविध रंगात त्याच्या वैचित्र्यात, विविधतेत, नाचऱ्या पानाफुलात, हसऱ्या चंद्रचांदण्यात, वेडया वाऱ्यात डोलणाऱ्या झाडात मला कुठे तरी एक सूर सापडतो, त्याच्यावर मी मनापासून प्रेम करतो; या साऱ्या साऱ्यातल्या परमेश्वराच्या अस्तित्वाने मी नतमस्तक होतो. नकळत हात जुळतात. ओठावर गीताची लकेर अलगद उमटते. ती ह्याच ओढीने ! अन् त्यानेच दिलेल्या स्फूर्तीने जीवनातल्या अनेक नादात माझ्या शद्बांना सूर गवसलाय–पावसाच्या टप्टपीत, घडयाळाच्या टकटकीत, पाना

पानांच्या सळसळीत, अगदी सर्कसच्या बँडमध्येसुद्धा,ढोलक्यावरची थाप आणि पेटीवरच्या अलगद फिरलेल्या हातातून उमटलेले सूर कानावर आले की एक गोड शिरशिरी उमटते. मी एखाद्या वासरासारखे कान टवकारतो. मनाच्या पापुद्र्यात अगदी खोल. आत कुठेतरी हालचाल होते. तो नाद, ती लय जीवनाच्या सुख-दुःखाशी एकरूप होतात. नि नकळत ओठावर येतात. गीत फुलतं गीत उमलतं, शब्द सूर होतात. भाव रंग घेऊन सजतात !

तेव्हा रसिकांनो ह्या आतून मिळणाऱ्या प्रेरणेपासून ही प्रकाशाकडची वाटचाल ! माझ्या मनीची सारी सारी कथा मी मोकळेपणाने सांगितली. ह्या संग्रहातले तुम्हाला जे आवडेल तो ओंकाराचा प्रसाद समजा ! दोष अन् अपूर्णता माझ्या आहेत. मित्रांनो सदासर्वदा अपूर्ण असलेल्या एका अगतिक माणसाच्या !

आपला नम्र

**माधव व्यं. निमक**



# पुरस्कार

दूरभाष ५४४७३ गोपीनाथ तळवलकर
'रामकृष्ण', नातूबाग पुणे ३०.

श्री. मा. व्यं. निमक यांनी रचलेल्या या कविता वाचून फार आनंद झाला. अगदी पहिल्या प्रथम माझे आवडते 'बालकवी' यांच्यावरची कविता लागली. आणि आल्हाद वाटला. असे चाळता चाळता माझे परमप्रिय मित्र आणि स्फूर्तिदाते आचार्य अत्रे यांच्यावर काव्यपुष्प वाहिलेले आढळून आले; अनेक मधुरस्मृती जागृत झाल्या आणि मनाला थोडे व्यथित केले. याच उत्सुकतेने पुढे कविता वाचत गेलो. आणि मनाला आनंद होत गेला. कविता या गोष्टीवर श्री. निमक यांनी ध्येयात्मक लिहिले आहे. 'उर्मिला' हा विषय जरी शिळा असला तरी त्याची गोडी अवीट आहे. 'तांडेला रं हाकार नाव' असे एखादे सागरगीत मध्येच आढळते. कवि जर सौंदर्यवादी असेल तर श्रीकृष्णाचा काळ हा त्याच्या काव्याला नेहमीच उधाण आणतो. 'सोड माझी वाट !' 'जाऊ नको तू कान्हा' ये गोपाळा' इ. गाणी मनाला मोह पाडतात. सर्व कवितात प्रेम कविताही पुष्कळ आहेत. आणि त्यात गज्जल गीतांचे सूर आळविले आहेत. यात घेतलेली लघु गुरुची सवलत फारशी तापदायक होत नाही. माणसाचा चंद्रावरील विक्रम काय किंवा भारताचे आजचे चित्र काय कवी हा चालू स्थितीशी संबद्ध आहे, याची जाणीव करून देतात.

मला विशेष नवल वाटते ते कवीची भाषा काव्यमय आहे. सृष्टिवर्णन असो किंवा अंतरंगातील तरंगाचा आविष्कार असो,

कवितेतील शब्द काव्यमय असतात. ही कविता प्रयत्नाने रचली नसून सहज गाता गाता बाहेर पडली आहे हा भाव मनात पक्का होतो. कित्येक कल्पना पुन्हा आल्या आहेत. अगदी सामान्य विषयावरचे (सॅम्पल-पाव) असले उल्लेख खटकतात. बाकी काव्याची भाषा सुंदर आहे. श्री. निमक यांच्या हातून अशीच काव्य निर्मिती होत जावो असे मी प्रेमाशीर्वादपूर्वक इच्छितो.

**गोपीनाथ तळवलकर**
(नाना.)



# समर्पण !

ज्यांच्या सदैव टवटवीत कवितेने मला प्रेरणा दिली व शब्द सूर झाले त्या बालकवींच्या चरणांवर–

गेला ‘ बालकवी ’ उडून टिपण्या सौंदर्य स्वर्गातले !
घेतो मी सुकुमार बिंदु इवले तेजातले आपुले !
मी कैसा कवि शून्य क्षुद्र अवघे मोठ्याच शून्यातले,
धैर्याने रचितो परंतु कवने वंदून ‘ ती पाउले ! ’
रात्रीही उठतो नभात बघतो, त्या दूरच्या चांदण्या,
माझ्या मी हृदयी कळून चुकतो, त्वत पाउलांच्या खुणा !
झाले होतिल ते कवी कितिकही येथेहि पृथ्वीवरी,
त्यांना तू ठरशील बालकवि रे आधार दीपापरी !’
जेव्हा त्या पडती प्रदीप्त आगळ्या उल्का नभा छेदुनी,
प्रेमाने हृदकोंदणात जपतो पंक्ती तुझ्या जाणुनी !
येती का नकळे उरात मम या उर्मी पुन्हा दाटुनी,
वेडा मी चुकतो अजाण म्हणुनी गेला तुम्ही येवुनी !’

२४–१०–७७

# मला वाटते !!

मला वाटते काव्य लिहावे !
प्रतिभेचे नव कण उधळावे
सौंदर्याच्या सोमरसाचे
आकंठ अगणित मधुघट प्यावे !!

मला वाटते काव्य श्रवावे
कर्ण पाकळी अन् फुलवावी,
गोड सुरांच्या तरङ्गिणीने
हृदयमंदिरे शांत करावी !!

मला वाटते इंद्रधनूंचे
निर्मावे जग कवी मनातिल
आणि पहावे नव्या जगाचे
रंग रुपेरी किती निरंतर !!

९-८-५६

22337 का०५ 2375 (स्थळ प्रत)

# आवाहन !

भावनेच्या कल्पनेच्या फुलवण्या या मंजिरी,
येइ प्रतिभे, येइ प्रतिमे ! येइ कविते तूं उरी ! ॥ध्रृ॥
प्राकृतातिल संस्कृतातिल जमविली मी संपदा
प्रेम जिकाया तुझे गे ! सोसल्याही आपदा
ज्ञानिया–तुकया जनीची तूच असता पंढरी
येइ प्रतिभे, येइ प्रतिमे ! येइ कविते तू उरी ! ॥१॥

रुपगंधाचेच पडले शब्द लयितुन बघ सडे !
धुंद ध्वनिही कंठी आला स्वागतास्तव तुज पुढे !
कां न येशी तूच तरि गे सांगता वेडचा परी ?
येइ प्रतिभे, येइ प्रतिमे ! येइ कविते तू उरी ! ॥२॥

अंबरीच्या शारदेची तूं दूजी ना साउली ?
आत्मतेजाच्या रूपाची इंद्रधनु वा चिमुकली ?
मायबोलीच्या गळचातिल तूच कंठी गोजिरी !
येइ प्रतिभे, येइ प्रतिमे ! येइ कविते तूं उरी ! ॥३॥

आज मी बेभान बनुनी सांगतो अश्रूंतुनी,
दूर तू लोटू नको मज लोटता जगिया कुणी !
अज्ञजगि मी उडून जाता थांब तू प्रतिमे परी !
येइ प्रतिभे, येइ प्रतिमे ! येइ कविते तू उरी! ॥४॥
२३–७–७७

# कशी होते कविता ?

मनांत जेव्हा होते खळबळ
भाव दाटती अंतरी अवखळ !
डोळ्या आतिल कंगोऱ्यातून
अश्रू टिपती भाव मृदुल कण ! ।।१।।

कधी मनातच उठते काहुर,
जिवास लागे वेडी हुरहुर !
नजर धावते चराचरावर
सौंदर्याचा धुंडित मोहर ! ।।२।।

कधी मनाची होते चाळण,
पिसाट प्रतिभा उरात धावुन !
शब्द सांडती शब्दामागुन
गीत गुंफुनी सुरांसुरांतुन ! ।।३।।

कधी लयीचे होते नर्तन
टप्टप् टोले मनांत आपटुन !
आणि प्रतिभा म्हणते आतुन
'येवू कां मी शब्दा वेढुन ? ।।४।।

विसरा जन हो ! शब्दामागिल
खुळ्या मनातिल अवखळ हे खुळ !
ध्यानी ठेवा ! तुम्ही केवळ !
'जेथे पाणी, तेथे ओघळ ! ! ' ।।५।।

३१-३-१९७४

# कविता म्हणजे !

कविता म्हणजे नाही केवळ
शद्बांचा तो रुक्ष पसारा !
कविता आणि नाही पोकळ
भावशून्य अन् गद्य उतारा !

काव्य असे पण कोंब कोवळा
कल्पलतेला अंकुरलेला !
छे पण ! हा तर शब्दामधला
स्वप्नरसाचा अद्भुतप्याल !

कविता म्हणजे आहे स्पंदन
कवी मनाच्या गाभाऱ्यातिल !
कविता अगळे सुंदर कंकण
प्रतिभेमधल्या इंद्रधनूतिल !

कविता म्हणजे क्रांती ज्वाला
जी झेपावे हृदय आभाळा !
ओढ लागते त्या ज्वालेला
शद्बा शद्बाला भिडण्याला !

कविता मोहक सळसळ नागिण!
हरित मनाच्या हिरवाळीतिल !
कविता आणिक नवतारांगण
शद्बातुन जे चमके कणकण !

केव्हा येतो कवी मनावर
कारुण्याचा उगाच दहिवर !
त्या ओलीला फुटतो पाझर
काव्याचा अन् बनतो निर्झर !

कविता केवळ एकतानता
गुंफण दुसरी सूरलयीतिल
हीच अनोखी अमृत सरिता
ऋजुता ममतेच्याच बनातिल !

हाक आईची होते कविता !
आस प्रियेची असते कविता !
उफाळते जेथे उत्कटता
तिथे उमलते नकळत कविता !

कविता केव्हा होते सुंदर
धूसर पडदा प्रणयि मनातिल !
भावुकतेला जेथे झालर
पडते विरहाच्या रंगातिल !

नका दाखवू मजला कोणी
'कविता' म्हणुनी ओंगळ
ओघळ !
ती तर आहे सरस्वतीचे
शद्बा मधले कोरीव पाऊल ॥

५-७-७६

# अश्विनी पौर्णिमा

सरे आश्विनी मधुक्षणांची
नसे प्रिया परि ह्या हृदयाची,
सुखावेल का विकल प्रेमिका ?
विलोभता अन् चंद्रशितलता

वृक्ष लतांना चुंबु लागले
लाजेने का लाज लाजले,
त्या लज्जेचे थेंब ठिबकले
वेलीवरती दंव ते सजले !

पूर्ण चंद्रमा क्षितिजावरती
स्वर्गकन्यका अवती भवती
शशि-ताऱ्यांच्या ऐशा क्रीडा
भग्न जीवांना देती पीडा

चुंबनी रमली कितीक युगुले
वाऱ्यावर निश्वास सांडले
मधुकर पुष्पे रास खेळले
चंद्र चांदणे त्यांचे झाले !

चंद्राचे हे नव्हे चांदणे
सृष्टीचे जणु दुःखद गाणे !
नयनातुन जे अश्रू गळले
नभो अंगणी मौक्तिक झाले !

सृष्टीची ही अगणित किमया
जगी चालली आनंद द्याया
कां नच चाले मनी माझ्या ह्या
अंधारातुन प्रकाश द्याया

रजनी माता पाजत आपुले
बसली घेवून बाळ सानुले
ओष्ठीचे जे अमृत गळले
मधुर चांदणे त्याचे झाले !

मिष्किलतेने हसू लागली
नभो अंगणी शुक्र चांदणी
येइल तेव्हा खरी आश्विनी
नकळत येई जरी साजणी !

अश्विनी पौर्णिमा १९५३

# स्वप्नाङ्गना

सांग बाले हृया खुळयाला
त्या स्मिताचे मोल ना,
मोल छे ! अनमोल देना
तू मनी स्वप्नांगना !

बाट चाले मोतियाची
कृष्ण त्या केशातुनी
हासवी ही केशभारा
मूक कलिका कमलिनी !

कुंकुमाचे तिलक ल्याले
रक्तिमा कां सांग ना ?
माणिका वा लाभलेले
भाग्य तुझिया कोंदणा ?

चोरी केली कां उषेची
लाल लाली गालिना !
गाल गाली हासुनिया
छेडसी कां हृया मना ?

मद्य प्याले ते दडाले
नेत्रकमळी होय ना ?
इष्करतिचे वा मिळाले
मोनरूपी लोचना !

कांचनाची काय केली
कांति देहा सांग ना !
पान छे हे केतकीचे
रंगी रंगी रंगेलना ?

बाहुली ही रेशमाची
वा दुजा स्वर्गांगना ?
अंबरीच्या ईश्वराची
साउली कां तूच नां ?

स्पर्शण्या कां कल्पनेला
पातली ही शोभना
मोडुनिया झोप माझी
कां पळे स्वप्नांगना

यामिनी ही काय आली
चाळवाया 'त्या' स्मृतीला
जीवनी हा जीव जगला
स्वप्नरंगी दंगण्याला ! !

आश्विनी पौर्णिमा १९५३

# निसर्गगूढता

गार गार गवतांत
दंवबिंदू हंसतात
नाही कोणाला कळत
कां हे लाजेने लाजत ? ।।१।।

खळखळे तो हा ओढा
झुळझुळे वारा वेडा
हांका कोणा हे मारत
कोणा आहे कां ठाऊक ? ।।२।।

संध्या साऊली पातली
चंद्रा सांगती खेळली
चंद्र रंगीही रंगली
कोण्या खेळे ती दंगली ? ।।३।।

वेळु वेळूंच्या बनांत
सुरसुरांचे संगीत
वाजे बासरी ती गोड
नाही होत काही फोड ? ।।४।।

भाव आंत जे पोळले
प्रेम कारुण्य दाटले
नाही सारे हे आगळे
डोळे कां हे पाणावले ? ।।५।।

शोभे नभी रंगावली
सप्तरंगी चितारली
कोण रेखाटे चितारी
रोज रोजाने अंबरी ? ।।६।।

घेती शद्बांतूनि ठाव
काव्य कल्पना ते भाव
ध्वनी प्रतिमा उमटे
कोणा कवि कां कळते ? ।।७।।

प्राणी जगी जे जगती
मृत्यु घेऊनी संगती
श्वासासंगे त्यांची गती
कोठे कैसे ते भ्रमती ? ।।८।।

प्रेम होई प्रेमिकांचे
द्वैत जाई जीवनिचे
प्रीत करिती जरी ते
कां न प्रेम समजते ? ।।९।।

ऐशा अनंत किमया
कवी-मना मोहवाया
केली देवाजीने माया
नाही मानवा कळाया ! ।।१०।।

५–४–१९५४



# भाऊबीज

ताई तुझ्या त्या स्मृति चिंतनाने हृदयात कांही तरी पोळले
डोळ्यात होत्या तया आसवांनी अग्नीस माझ्या परि शमविले
चित्रे जुनी आपुल्या सांगतीची मनोमंदिरी कांहिशी हासली
बाल्यात गेलो गतःकालच्या मी हर्षीत झाल्या तनूवल्लरी ।।
खेळोन प्रेमे खोटी लढाई घरी येइ होई पुन्हा भूषण
रागांत रागे जरी बोललीसी अमृत गंगा झरे आतुन ।।
दीपावली दिव्य रूपात आली सुवासिञ्यने सिञ्चते हे जग
जावो निया दूर तू राहसी गे तरी अंतरी सन्निधि नित्य ग ।।
सोने न क्षुद्राङ्ग हे या जगीचे वृथा पाडते मोह कूपी जन
हेमन्त ? छे, हे ! हृद्संपदा ही तुला बीज घे जी जगी भूषण
जाईल सोने नि जाईल चांदी जगी जातसे लोपूनि सर्व कांही
आहे परंतु मनी प्रेम जे ते कधीही कधीही न लोपून जाई ।।
२१–१०–५५

# कुठें धावते

बाल्या मधल्या मखमालीतुन
तारुण्याच्या हरित तृणातुन
प्रौढपणाच्या चाकोरीतून
-कुठे धावते जीवन-सरिता ।।१।।

आशेच्या त्या रविकिरणातुन
नैराश्याच्या अंधारातुन
अनुभवतेच्या तप्त उन्हांतुन
-कुठे धावते जीवन-सरिता ? ।।२।।

आयुष्याच्या जलाजलातून
सुखदु:खाची वळणे घेऊन
अधीरतेने काळा तुडवून
-कुठे धावते जीवन-सरिता ? ।।३।।

स्वार्थाने अन् त्या निस्वार्थे
जीवन घेते, जीवन देते !
खळखळणारी तळमळणारी
-कुठे धावते जीवन-सरिता ? ।।४।।

गूढ गुंजनी हसते डुलते
कोठून कोठे येते जाते ?
माझी असुनी मला न गमते
-कुठे धावते जीवन-सरिता ? ।।५।।

२२-११-१९५५

# " केव्हां ? "

केव्हा पाहिन चंद्रबिंब ते
तुझ्या मुखाचे दारा आडून ?
दर्वळेल कधि मुक्या मनांचे
मुके बोलके हितगुज चंदन ! ।।१।।

केव्हां दिसतिल गोऱ्या गाली
भुरभुणारे काळे कुंतल ?
केव्हां पाहिन मृदुकेशांतिल
लाल गुलाबी गुलाब कोमल ? ।।२।।

केव्हा घडतिल मुक्या बोलक्या
नेत्रातुन ती शरसंधाने ?
केव्हां पाहिन तुझ्या मुखावर
भाव स्मितांची मोहक स्वप्ने ? ।।३।।

केव्हां भिडतिल तुझ्या नि माझ्या
ओष्ट कळयांच्या कमल पाकळया ?
केव्हां हसतिल चांदराति त्या
तुझ्या नि माझ्या डोळयांमधल्या ? ।।४।।

केव्हां होईल धडधडणाऱ्या
हृदयाचा तो स्पर्श गुलाबी ?
रंगेल कधी रतिमदनाचे
इष्करसाचे स्वप्न शराबी ? ।।५।।

केव्हां होईल तुझी नि माझी
भेट चोरटी उन्हात शीतल ?
केव्हा होईल साफल्याचे
जीवन अधिरे सुरम्य मंगल ? ।।६।।

५-८-१९५६

## " देवा तुझी सांजवात ! "

भाविकांच्या देव्हाऱ्यात
साधुसंताच्या घरात
आहे संथ मी जळत
देवा, तुझी सांजवात ! ॥१॥

भक्तिभावाचा ओलावा
जेथे ज्ञानाने फुलावा
तेथे डोलते हंसते
देवा, तुझी सांजवात ! ॥२॥

नको मोठे राजवाडे,
नको अत्तराचे सडे
सान सेवेसाठी तुझ्या
देवा, तुझी सांजवात ! ॥३॥

तुझ्या पायाशी लोळणे
तुझ्यासाठी माझे जीणे
तुझ्या सेवेत हंसते
देवा, तुझी सांजवात ! ॥४॥

तुवा केली ही प्रभात
आणि सोनियाची ज्योत !
काय तुला बा देणार ?
देवा, तुझी सांजवात ! ॥५॥

‘ त्याग ’ माझी शिकवण
त्यागासाठी हे जीवन !
त्यागासंगे मी संपते
देवा, तुझी सांजवात ! ॥६॥

तुजसाठी माझे येणे
सांजकाळी प्रकाशणे !
झोप ! जाते देवराया !
देवा, तुझी सांजवात ! ॥७॥

९–१०–५६

# आई तुझ्या आवरी आसवाला

जाते जरी मी दिलेल्या घराला
आई तुझ्या आवरी आसवाला ।।ध्रु।।
जाईल भाऊ तो नोकरीला,
जाईल ताई दुजा सासराला,
भरल्या घराचा संपेल ठेवा !
आई तुझ्या आवरी आसवाला ।।१।।
राखेन मी शील ते नाव आई
आहे तुझे जे जे सर्व कांही
नको बोचणी त्या जळत्या जिवाला
आई तुझ्या आवारी आसवाला ।।२।।
निःशब्द कां रे बाबा नि ताई
हंसा एकदा अन् नको आसवेही
उगा कोंडता का मुक्या भावनेला
आई तुझ्या आवरी आसवाला ।।१।।
जाणार जरि वाट ही सासराला
चिमणी न आडवे उडत्या पिलाला
उडत्या पिलांचा पसाराच सरला
आई तुझ्या आवरी आसवाला ।।४।।

१३-८-१९५६



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ...
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# पायदळीची फुले !

(वेश्या ह्या समाजात कमी लेखल्या जातात; त्यांच्या मनोविश्लेषणावर या कवितेची मध्यवर्ती कल्पना आधारित आहे ! )

पायदळीची फुले जरीही
तुडवुं नका परि पायदळीही ! ।।ध्रु।।

तुमच्यासाठी हंसणे फुलणे
फुलुनी सुकतां रंग बदलणें
कां चुरगळता सुगंध सेवुनी
तुडवु नका परि पायदळी ही ! ।।१।।

चुरगळताना मनें नि शरीरे
दुःख विझवितो पापणीतले
उपहासाने भ्रष्ट लेखुनी
तुडवु नका परि पायदळीही ! ।।२।।

शरिर बेंचणे दमडीसाठी
एकच धंदा एक रहाटी
धनिक विकारी कर्दमात जरि
तुडवु नका परि पायदळीही ।।३।।

समाजनीतिसाठी अनीती
अनिती आमुची एकच नीती
वेश्या ! म्हणुनि दुखवू नकाही
तुडवु नका परि पायदळीही ।।४।।

स्पंदत असता हृदय पाकळी
कारुण्याची असह्य गाणी
कुलटा ! म्हणुनी फुलेंबापुडी
तुडवु नका परि पायदळीही ॥५॥

अपमानाने लत्ता खावुनी
रडतां हसतो पिचता आतुनी
चिरडत असतां एक आळवणी
तुडवु नका परि पायदळीही ॥६॥

सभ्यजगीची भ्रष्ट जीवने
पाप वेचती मुक्या मनानें
देवाजीची फुले करंटी
तुडवु नका परि पायदळीही ! ॥७॥

९-१०-१९५६



# तुझी जनी ही तुलाच देवा–

तुझी जनीही तुलाच देवा
तुझ्याच नामे तुला सजविता
कां हसला गाली ! विठ्ठला ! ।।ध्रृ।।

विठ्ठल-विठ्ठल गाता भजनी
उभा पंढरी मागे चोरुनी
वेडी माझी प्रीत पाहुनी
कां हसला गाली ? विठ्ठला ! ।।१।।

हसे चांदणे कृष्ण मुखावर
तेज लोळते पदकमलावर,
रखुमाईच्या अगा प्रभू तर
कां हसला गाली ? विठ्ठला ! ।।२।।

विठ्ठल-विठ्ठल एकच गाइन
जनी मनी मी विठ्ठल पाहिन,
तुझी पायरी प्रिय मुक्तिहुन
कां हसला गाली ? विठ्ठला ! ।।३।।

२३-४-१९५७

# दाखवा तीच पुन्हा पाऊले !

ज्यास पाहण्या आसुसलेले
नयनांचे शिंपले--
दाखवा तीच पुन्हा पाऊले ।।धृ।।

रघुराजाची हृद्य पाऊले
वंद्य जाहली जी पद कमले,
अऽहिल्येचे ज्या चरणांनी
जीवन फुलविले-- ।।१।।

सांगा रामा लव-कुश आता,
'भ्रष्ट कधि न हो आमुची माता !'
व्यर्थ त्यागिली जानकी-सीता
रजक निंदल्यामुळे-- ।।२।।

अश्रमात ह्या पडता पाउल
मांगल्याने फुलेल राउळ,
लवांकुशाच्या बालमुखावर
हसेल मधु चांदणे-- ।।३।।

जरी न दिसली पदे प्रभूची
विझेल ज्योती पतिव्रतेची
मिटतिल आणि उधळूनि मोती
नयनांचे शिंपले-- ।।४।।

१-५-१९५७

# लक्ष्मणाची सती उर्मिला !

वनवासाला रामा जाता
जर हो मागे पहाल आता
दिसेल जळती जीवंत ज्वाला
लक्ष्मणाची सती उर्मिला ! ध्रु ।।

नसेल गेली वनवासाला
कधीहि ल्याली जी न वल्कला
परि त्यागाची मूर्त मेखला
लक्ष्मणाची सती उर्मिला ! ।।१।।

हृदया मधला विराट अग्नी
जिने शमविला नयनाश्रुंनी
विषय पळाले जिच्या तपांनी
लक्ष्मणाची सती उर्मिला ! ।।२।।

कशी कंठली वर्षे चौदा
पतिसौख्याविण उर्मिले सदा
सीतेहून तू धन्य सर्वदा
लक्ष्मणाची सती उर्मिला ! ।।३।।

पती सुखाला आचवणारी
पतिव्रतांना लाजवणारी
प्रभू पथातिल एक पताका !
लक्ष्मणाची सती उर्मिला ! ।।४।।

रामसिताहो ऐका ऐका !
भुलली ही नच कीर्ति लौकिका
करण्या जगते दीर्घ प्रतिक्षा
लक्ष्मणाची सती उर्मिला ! ।।५।।

४-२-१९६०

# शोधू कुठें माधवा, तुला मी ?

मंजुळ पावा, नाही ऐकला
नाही पाहिली काळी कपिला,
म्लान मुखाने म्हणते राधा
शोधू कुठे माधवा, तुला मी ?

संचित बैसे होऊन उन्मन
गोऱ्या गाली रुसवा फुगवून
पाणवलेले नेत्र बोलती
शोधू कुठे माधवा, तुला मी ?

विसकटलेल्या केसावरती
नाही खोवली आज केतकी
स्फुंदत बोले विलगत अधरा
शोधू कुठे माधवा, तुला मी ?

गौर अंगुली दंते चावून
मध्येच ओष्टा रागे दुमडून
म्हणे बावरी व्याकुळ होऊन
शोधू कुठे माधवा, तुला मी ?

दिसता नकळत शामल मोहन
भोळी राधा विसरे तनमन
हर्षभराने म्हणते चुंबुन
शोधू कुठे माधवा, तुला मी ?

७-१-१९६७

# जसे फुलावे

जसे फुलावे फूल गोजिरे
वेलीवरती नकळत आगळे
तसे असावे बाळ सानुले
मोहक सुंदर राजस हंसरे !

जसे टपोरे-फळ डोलावे
आम्रराजीच्या-हिंदोळ्यावर
तसे रुळावे-बाळ गोबरे
मातेच्या अन् कराकरावर !

जशी असावी-आरक्त दिप्ती
रविराजांच्या-आगमनाची
तशी फुलांवी-गुलाब कांती
लोभसवाण्या- युवराजांची !

प्रतिभेला झणी जशी फुटावी
पान पालवी- उत्कटतेची
तशी स्फुरावी-अस्फुटवाणी
सोन सख्याच्या-रसनेवरची !

जशी झडावी-रास सारखी
फुला परी त्या-प्राजक्ताची
तशी पडावी-देवाजीची
कृपा पिलावर-मांगल्याची !

१४-१२-६८

## प्रणयिनी

स्वप्नातल्या सुरांना
दे साथ संगतीची !
रुजु दे मिठीत तुझीया
प्रीती अतूट माझी ! ।।ध्रृ।।

प्रणयास आज भरती
तू देइ सागराची !
स्पर्शात मीलनाने
भिजतील स्वप्न–पक्षी ! ।।१।।

भीती मला कशाला
त्या चंद्र चांदण्याची ?
तरुच्या कुशीत बिलगे
जर रात्र पौर्णिमेची ! ।।२।।

मज ओढ ना सुखाची
वा आस तव धनाची
फुलु देत यौवनाची
परि गंध वेल माझी ! ।।३।।

१७–६–१९६९

# प्रियतम माझ्या प्रल्हादाला

(कै. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या पायावर हे काव्यपुष्प अर्पण करीत आहे.)

महाराष्ट्राची मंगल-माता
अश्रू ढाळूनि म्हणते आता
' कोणी नेले मराठमोळ्या
प्रियतम माझ्या प्रल्हादाला ? ॥१॥

सह्यांद्रीची ज्याची छाती
उरी कधी नच ज्याच्या भीती
कोणी नेले ऐशा वीरा
प्रियतम माझ्या प्रल्हादाला ? ॥२॥

साहित्याच्या स्यमंतकाला
काव्यकलांच्या कमलफुलाला
हिरावले कां राजस बाळा
प्रियतम माझ्या प्रल्हादाला ? ॥३॥

अमृत स्रवते ज्याची वाणी
आसू हासू ज्याच्या नयनी
कोणी नेले नाट्य नृपाला
प्रियतम माझ्या प्रल्हादाला ॥४॥

शिवशक्तीच्या त्या सिंहाला
औदार्याच्या मेरू गिरीला
कां काळाने नेले सांगा
प्रियतम माझ्या प्रल्हादाला ? ' ॥५॥

९-७-१९६९



# लहान मानव महान आहे !

चंद्रा तुजला चाहुल नव्हती अमुच्या शक्तीची
पराक्रमाची, अद्‌भुततेची मानव क्लृप्तीची !
कवि-लेखक ते तुला वंदति प्रतिभेच्यासाठी !
प्रेमी-प्रेमिक याचक बनती तव रश्मीसाठी !
मोहित केले सौंदर्यानें कालीदासा तुवां !
भाली बसुनी विनम्र केले कैलासाच्या शिवा !
अमेरिकेचे तिघे प्रवासी भेटी तव आले
' मानवतेचे ' निशाण रोवुनि अमर जगी झाले !
अजाण होता मानव जोवर भुलला चंद्रा तुला
सुजाण होता तुडविल आता टाचेखाली तुला !
रजनीनाथा गर्व नसावा आपुल्या दीप्तीचा
लहान मानव महान आहे धरणी मातेचा !!!

२३-७-१९६९

# मज याद आज यावी !

या शांत सांजकाळी
या धुंद -धुंद वेळी
सजणा तुझी शराबी
मज याद आज यावी ! ।।धृ।।

तू सूर आज द्यावा
माझ्या गळी रुतावा
गाणी तुझी गुलाबी
माझ्या मुखी स्फुरावी ! ।।१।।

तू फूल सान व्हावे
मी पाकळी असावे
स्पर्शास तृप्ति यावी
गंधात साकळावी ! ।।२।।

तू विहगरूप घ्यावे
मी पंख आणि व्हावे
गगनांत चांदण्यांनी
आपणास 'दाद' द्यावी ! ।।३।।

या धुंद-धुन्द समयी
तू शाम, राधिका मी
ये चोर पावलांनी
गुंफावया करांनी ! ।।४।।

तू चंद्र, रोहिणी मी
चमकू निळ्या नभी ही !
किरणांत मीलनाची
फिरवू जगात ग्वाही ! ॥५॥

तू आम्रवृक्ष राजी,
तर वेल मी कडेची,
आधार मागते मी
दे सावली प्रितीची ! ॥६॥

तू दूर दूर जरि मी
जशी मेघ आणि अवनी
स्वप्नात येई बसुनी
ही याद पांघरोनी !! ॥७॥

१५-२-१९७१



# तांडेला रं हाकार नाव !

माडानं मढलय, सागानं सजलंय
लाटांच्या पिसांत लोळतय गांव
तांडेला रं ऽ ऽ हाकार नाव तू हाकार नाव ।।ध्रृ।।

जवल आल्याति गौरी–गनपती
माहृयेरची लोग जमत्याल किती !
गातील गानी, नाचून आनि, त्यो मला गांव तू दाव ।।१।।

माय माऊली आसलरं दारी
रामा नि धर्मा भाऊ शेजारी
गोऱ्या गुनाची बहीन हाय रं, त्यो मला गाव तू दाव ।।२।।

दर्याला उधानं आलया भारी
सुसाट वाऱ्याशी थैमान करी
भीतीच्या भवऱ्यानं, तांडेला आतां उराचा घेतला ठाव ।।३।।

विजेची वल्ही ढगाचं पानी
चंद्राची नौका कापते आनी,
देवाची माया, गाऊ या गानी हाकार भरारा नाव ।।४।।

२८–१–१९७१



# इतिहासाची रंगव पाने !

नव्या मनू हे पुरे झोपणे
ऊठ आता तू निर्धाराने
जुन्या पिढीचे तुला सांगणे
इतिहासाची रंगव पानें ! ।।ध्रृ।।

आस्तिक नास्तिक नको भांडणे
आत्मिक भौतिक एकच नाणे
मानवतेच्या शांतिसुधेने
इतिहासाची रंगव पाने ! ।।१।।

शब्दाने तर कधी शस्त्राने
मंत्राने तर कधी अस्त्राने
अश्रु, रक्त तर कधी घामाने
इतिहासाची रंगव पाने ! ।।२।।

विज्ञानाचा सेतू बांधून
अज्ञानाला मागे रेटून
नवप्रगतीचे गाण्या गाणे
इतिहासाची रंगव पाने ! ।।३।।

९-३-१९७१

# ही प्रीत जागवावी !

रश्मीत रंगलेली
तू चांदण्यात यावी
ही प्रीतवेल इवली
ती तूच वाढवावी

शृंगार ल्यायलेली
रंभेपरीहि यावी
खोवून डोइं बकुळी
बिलगावयास यावी ! ।।१।।

ओठांत थबकलेली
गाण्यास तान यावी
मैफील खंडलेली
तू आज गाजवावी ! ।।२।।

ही प्रेमज्योत आपुली
फुलवावयास यावी,
आसवांत नाहलेली
वा प्रीत संपवावी ! ।।३।।

१६-१०-१९७१

# सज्ज आहे हिंदुस्थान !

रण दुन्दुभिने भरू अस्मान,
रणनौबतिने घुमवू कान,
पराक्रमाच्या शर्यतीसाठी
सज्ज आहे हिंदुस्थान ! ॥१॥

कोटी कोटी हात पुढे
देण्यासाठी आज लढे !
मातेच्या या हाकेसाठी
सज्ज आहे हिंदुस्थान ! ॥२॥

शत्रूचे भरलेत घडे
त्याला चारूं आज खडे,
मानवतेच्या अब्रुसाठी
सज्ज आहे हिंदुस्थान ! ॥३॥

मोठ्या मोठ्या तोफांतून
गोळे येतिल आग ओतून
टँक-विमाने झुंजेसाठी
सज्ज आहे हिंदुस्थान ! ॥४॥

आईचा करतिल अपमान
कापून ठेवू त्यांची मान
रिपु-रक्ताच्या स्नानासाठी
सज्ज आहे हिंदुस्थान ! ॥५॥

१४-११-१९७१

# जाऊं नको तूं मुंबईला !

थोरा घरली पोर लाडकी, आली जरा तू पाडाला !
बकाल, फसव्या, मोठ्या खोट्या जाऊ नको तू मुंबईला ! ।।धृ।।
गर्दी घुसते गाडीमधुनी रेस चालते मरणाची
पोरे-पोरी, वृद्ध बायका खिचडी होते सर्वांची,
माणुस हिंडे मुंग्यावाणी गणती नाही वाहनांची
रेटारेटीत जाऊन पोरी, माती होईल शरीराची ! ।।१।।
सँपल पावावरी भागते खळगी यांच्या पोटांची
मिसळी-भेळीवरी रंगते प्रीती येथिल पोरींची
फुट पाथावर लोळण घेते गरिबी येथिल लोकांची
श्रीमंतांना पर्वा नाही मजा नसे बघ खेड्याची ।।२।।
व्यभिचाराचा बसतो चटका फटका येथील चोरांचा
पत्ता-सट्टा इथे चालतो, मटका आणि मुंबईचा
छंदी-फंदी, विषयी नादी गांव असा या लोकांचा
बाई-दारू, रेस जुगारी, रस्ता दुसऱ्या नरकाचा ।।३।।
पाँडस्-पावडरी क्रीम सारवून चेहरे इथले फिरतात
अर्ध्या उघड्या मैना इकडिल 'कॅबेरा' ही पहातात
फिल्मी गाणी आणि वागणी चौपाटीवर दिसतील
मोटेवरली मंजुळ गाणी तुला पोरी कशी मिळतील ? ।।४।।
गोर गोमटी रसाळ गोटी गव्हाळ लवचिक खेड्याची
वाळुन जाऊन होशिल लुकडी "बोंबिल काडी" खाडीची
जवान पोरे चिलटे नुसती सोंगे हडकी फॅशनची
माधव वेडा म्हणुनि सांगतो वाट धरू नको मुंबईची ! !

१९-१-१९७२

# सोड माझी वाट !

पहाट वेळी निद्रित सृष्टी, निर्जन यमुना घाट
पहा अडवितो हा वनमाळी माझी पाऊल वाट !
अरे कृष्णा ऽऽ अरे कृष्णा ऽऽ !
माझ्या डोईचा फुटेल माठ
सोड माझी वाट तू, सोड माझी वाट ! ।।ध्रृ।।

गोकुळातल्या साऱ्या नारी
म्हणतिल मजला, अरे मुरारी
' किती आहे तू राधे अफाट ! '
सोड माझी वाट तू, सोड माझी वाट ! ।।१।।

दिवसा पाण्या जाता येतो
रात्री स्वप्नी मजला छळतो
नाही सोडत तू माझी पाठ !
सोड माझी वाट तू, सोड माझी वाट ! ।।२।।

आवरी देवा आवरी बासरी !
खोडयांनी तव झाले बावरी,
माझा भरायचा राहिल माठ !
सोड माझी वाट तू, सोड माझी वाट ! ।।३।।

माझं गोरं गोरं अंग
कान्हा केलं ओलं चिंब
कशी जाऊ मी आता घरात ?
सोड माझी वाट तू, सोड माझी वाट ! ।।४।।

५-२-१९७७

# कुणी कुणाचे नाही !

व्यर्थ पाश हे व्यर्थहि प्रीती
व्यर्थहि सारी नाती-गोती
कशास करिसी जमवाजमवी
कुणी कुणाचे नाही, वेड्या ! ॥१॥

पिता पुत्र अन् बंधू माता
मुले-मुली अन् सुन्दर कांता
ऋणानुबंधे जवळी यावी
फिरून दूर पळावी, वेड्या ! ॥२॥

स्वार्थाने कधि जडती नाती
स्वार्थ संपता सरते प्रीती
भरल्या कणसावरी पडावी
धाड जशी पक्ष्यांची, वेड्या ! ॥३॥

सोड सोड हे सखे-सोबती
जन्म-मृत्युची सोडहि भीती,
तुज जायाचे जर एकाकी
ठेवून सगळे काही, वेड्या ! ॥४॥

७-३-१९७२

# जाऊ नको तूं कान्हा !

नंद-यशोदा विनवे कृष्णा
जाऊ नको तू कान्हा, कान्हा ! ।।धृ।।

वृक्ष लतांच्या खाली माना
स्तब्ध जाहली सरिता यमुना
कपिला गायी हंबरतांना
जाऊ नको तू कान्हा, कान्हा ! ।।१।।

खिन्न मुखाने गोपी बघती
गुरे-वासरे जमती भवती
सखे सोबती आळवताना
जाऊ नको तू कान्हा, कान्हा ! ।।२।।

विळखा घाली तव चरणांला
वेडी राधा बघ गोपाळा
दुःखाश्रुंनी व्याकूळ ताना
जाऊ नको तू कान्हा, कान्हा ! ।।३।।

अधरी धर तो मंजुळ पावा
उधळ सूरांचा अमृत ठेवा
तुझ्याविना जग शून्य मोहना
जाऊ नको तू कान्हा, कान्हा ! ।।४।।

११-३-१९७२

# सांगू नको हे तू कुणा !

होते तुझी मी साजणा,
सांगू नको हे तू कुणां ॥ध्रृ॥

तू पाहता मी हासले
तू बोलता मी लाजले
परिस्तब्ध आता भावना ॥१॥

तू स्पर्शिता मी कंपले
तू चुंबिता हेलावले
ढळल्या प्रितीच्या त्या खुणा ॥२॥

वाळूत चित्रे रेखिली
स्वप्नें बिलोरी पाहिली
परिभास आता वंचना ॥३॥

तू चालता मी चालले
तू थांब म्हणता थांबले
तू दूर, येथे मी पुन्हा ॥४॥

विसरून माझा मीपणा
मी प्रीत केली हा गुन्हा
हो तू सुखी ! मज यातना ॥५॥

२६-३-१९७२

# फिके पडेल चांदणे !

फिके पडेल चांदणे
तुला बघून साजणे
चंद्रमाहि प्रियतमे
तुझ्या रुपात गे रमे ! ॥१॥

तरंग कुन्तलांतले
जलात दृश्य जाहले
तुझ्याच लोचनांमुळे
भृङ्ग होतीहि खुळे ! ॥२॥

कपोल पाहता असे
गुलाब साहूं मी कसे ?
कमलिनी सखे फसे
ओठ देखिता तसे ! ॥३॥

नासिका कळी जशी
चुटुक लाल छानशी
मोगरी पहा हंसे
दंत पाहता असे ! ॥४॥

कंठ आणि बोलणे
मधूर सूर सांडणे
सखे तुझेच वागणे
गुलाबपाणी शिपणे ! ॥५॥

मयूर नाचता म्हणे
तुझेच पाहू चालणे
कल्पनेत जे उणे
तुझ्यात मूर्त साजणे ! ॥६॥

२८-३-१९७२

# ये गोपाळा !

मीरा बैसली हरिभजनाला
अविरत म्हणते, "ये गोपाळा !"

एक तारीवर सुरांस उधळून
भक्ति रसाने गेली न्हाऊन
मिठी मारूनि प्रभुचरणाला
अविरत म्हणते "ये गोपाळा !" ॥१॥

अश्रू मागुन अश्रू गुंफून
भाव अर्पिते व्याकुळ होऊन
निद्रा-भूकहि नाही तिजला
अविरत म्हणते "ये गोपाळा ! ॥२॥

शाम विरघळे भक्ति पाहून
उभा ठाकला नकळत येऊन
आत्मरूप त्या श्रीरंगाला
मीरा म्हणते, "ये गोपाळा !" ॥३॥

७-४-१९७२



# उठा बाळराजे जाहली सकाळ

क्षितीजा लागली रवीची चाहूल
सोन्यानं सजलं रुप्याचं राऊळ
अभाळांत आली प्रकाशांची बाळ
उठा बाळराजे, जाहली सकाळ ।।धृ।।

मंद गात येई हळू ती झुळूक
देवाला आणाया पाकळीत जाग
उडे पाखरांची शिरी छान माळ
उठा बाळराजे जाहली सकाळ ! ।।१।।

गोड घाट वाजे गायिच्या गळ्यांत
धार अमृताची वासरे पितात
ऐक बासरीचे सूर ते रसाळ
उठा बाळराजे, जाहळी सकाळ ! ।।२।।

नका आडवू ते तेज पापणीत
मुखी चंद्रमा तो हसू द्या खुशीत
आहे अधीर आई ऐकण्यास बोल
उठा बाळराजे, जाहली सकाळ ! ।।३।।

२०-४-१९७२



# जा माणसा जा एकला

आला तसा तू चालला
जा माणसा जा एकला ॥धृ॥

माता-पिता कांता आता
विसरून जा गृहसंपदा
अंती सदा तू एकला ! ॥१॥

ती पाप-पुण्ये ही कदा
घडली जगी सुख आपदा
चिंता नको त्याची तुला ! ॥२॥

अज्ञात त्या जगतात जा,
ठेवून रक्षा आज जा !
आहे तुझा पथ वेगळा ! ॥३॥

स्वप्नांतुनी सत्यात जा
तिमिरांतुनी तेजात जा
तू आत्मकण विश्वांतला ॥४॥

६-५-१९७२

# माझी नाव रे

वाऱ्याच्या तालावरी
लाटांच्या झुल्यावरी
दैवाच्या डोलिपरी
    पहा डुलतिय, माझी नाव रे ! ।।धृ।।
(कोरस : नाव गे, नाव गे, नाव गे !
    किनारा झपझप दाव गे !! )
जशी बाणाची फेक
नभी घारीची झेप
देवा इंद्राची लेक
    पहा पळतिय, माझी नाव रे ! ।।१।।
आहे अंधेरी रात
चंद्र कोरीची साथ
करूं दैवावर मात
    पाणि कापतियं, माझी नाव रे ! ।।२।।
शिडात भरला वारा
भितीस नाही थारा
जोरानं वल्ही मारा
    गाणं गातिय, माझी नाव रे ! ।।३।।
मिणमिण प्रकाश सारा
देण्या तुम्हा उबारा
आला आता किनारा
    लाडली थांबलिय, माझी नाव रे ! ।।४।।

९-७-७२



# अधरी धर तूं पावा !

राधा विनवी शाम सुंदरा। अधरी धर तूं पावा, कुमरा ।।धृ।।

असा कसा तूं टाकुन मजला
कदंब वृक्षा खाली बसला,
अधीर तुझी मी वेडी राधा

ऐकण्यास तव सुरां, मधुरा ! ।।१।।

शोध शोधिले तुज मी कान्हा
गोकुळ घाटहि निर्जन राना
आतुर जरि मी तुझ्या दर्शना

चरण धरू दे जरा, ईश्वरा ! ।।२।।

रूसूं नको तूं असा माधवा
सगुण-निर्गुणा, ऊठ केशवा,
जमल्या गोपी, गायी देवा

वाजवि तर तो पावा, श्रीधरा ।।३।।

१६-७-१९७२

# विठूनाम ऐका !

पहा भाविकांनो दिसते विठूची पताका,
चला वारीमध्ये जाऊं, विठूनाम ऐका ।।धृ।।

पाय भाविकांचे पडती नाम गात गात
टाळ-मृदुंगाच्या साथी चालले सुरांत,
फुले, अबिर कोणी उधळे पहा तसा पैका

भक्ति सागरावरि डुलते पालखिची नौका ।।१।।

पांडुरंग पाही ह्यांची आषाढीस वाट
ज्ञानिया-तुक्याचे जाता पंढरीस भाट,
नास्तिकास नाही थारा, भक्तिच्या पताका

विठू-रखुमाईस देती हाकावरी हाका ।।२।।

कुणी बापुडाहि बोलो देव ना जगांत
पहा येथ विठ्ठल रमतो भाबड्या मनांत
बघा फिरुन कानी येतो विठूचाच डंका

चला वारीमध्ये जाऊं, विठूनाम ऐका ।।३।।

१६-७-७२



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 22337
काव्य
2335
(स्थळ प्रत)

# प्रीत दाटली उरी

मनो मनी क्षणो क्षणी
तुझ्याच येत आठवणी !
पदो पदी पिशा परी
प्रीत दाटली उरी ! ॥धृ॥

तूंच प्रथम हासली
हंसून लाजलाजली
नभातल्या सरी परी
प्रीत दाटली उरी ! ॥१॥

फिरून तूंच भेटली
तुझी न तूंही राहिली
स्वप्न होय शर्वरी
प्रीत दाटली उरी ! ॥२॥

कुठेंस तूं ? तुझा न मी !
असेल कां स्मृति उभी ?
कंठ दाटल्या परी
प्रीत दाटली उरी ! ॥३॥

तूंच जाण भावना
जरी दिल्यास वेदना !
भेटण्या कधीतरी
प्रीत दाटली उरी ! ॥४॥

१०-८-७२

# "तूंच जाण भाव मनीचे !"

बैस येथे माझ्याजवळी ऐकण्यास गीत
तूंच जाण भाव मनीचें शब्द आणि अर्थ ।।धृ।।

नको कुणी माझ्या जवळी तुझ्या विना एक
रसिक तूंच श्रोता असता नको ते अधिक
तुझ्या संगतीचा लाभो चंदनी सुगंध
तूंच जाण भाव मनीचें शब्द आणि अर्थ ।।१।।

शब्द तोकडे हे सारे भावना अथांग
तूंच काव्य डोळ्यामधुनी नवे नवे सांग
खुळ्या प्रेमिकाचें आहे खुळें प्रेमगीत
तूंच जाण भाव मनीचें शब्द आणि अर्थ ।।२।।

नको आज अश्रू सांडू मोति हे अमोल
तुझ्या विना वाटे मजला स्वर्गहीन फोल
काळिज हे तिळतिळ तुटते पिउन विरह रात
तूंच जाण भाव मनीचे शब्द आणि अर्थ ।।३।।

१५-८-७२

# " परिहि तुला न कळले ! "

हृदयात भावनांचे किति ताज मीच रचले
आसूं बनून सारे निखळून आज गेले !
ओठांत शब्द कितिदा बोलून आणि उरले
माझ्या मनातले ' ते ' परिहि तुला न कळले !
ते स्वप्न मीलनाचे जेव्हा अधीर झाले
किरणात मी आशेच्या विसरून सर्व गेले !
फुलत्या फुलापरी मी कितिदा हंसून फुलले
माझ्या मनातले ' ते ' परिहि तुला न कळले !
काही अता न उरले जे जे मनात स्फुरले
ते ताटवे प्रितीचे निर्माल्य मात्र झाले !
" सत्प्रेम या जगी रे जळते असेच सगळे ! "
माझ्या मनातले ' ते ' परिहि तुला न कळले !

२३-१-१९७३

# कोडे मनिचे उलगडले !

(वधु परीक्षेच्या दिवशी मुलीच्या मनाच्या स्थितीवर ही कविता प्रकाश टाकणारी आहे.)

उलगडले, मज उलगडले,
कोडे मनिचे उलगडले ! ॥धृ.॥

आज उभी मी सकाळपासून
दर्पण पुढती हाती घेवून
यौवन मजला हंसले खुदकन्
हंसले, फुलले, मोहरले मन ! ॥ १ ॥

केसाभवती मोगरी माळून
साडि गुलाबी भूषण लेवून
शृंगारहि मज लाजे पाहून
नटले, सजले, टवटवले मन ! ॥ २ ॥

पहा मंडळी बसली येवून
शेजारी मग लागे कुणकुण
आले "ते" हि पहावया अन्
हंसले, बुजले गोंधळले मन ! ॥ ३ ॥

अंतर तुटले भिडता लोचन
विसरून गेले माझे मीपण
'होकार' हि मग आला उमगुन
नकळे, कैसे कळले जीवन ? ॥ ४ ॥

२५-१-७३

# विरह छेडु दे, तुझीच गाणी !

प्रणय नको हा तुझा साजणी
दंबबिन्दू तो केवळ पानी !
स्वप्न पाहु दे मिटुन पापणी
विरह छेडु दे तुझीच गाणी !

जाग नको मज स्वप्नामधुनी
हास्य नको मज अश्रू वाचुनी
प्रीत फुलू दे, प्रिया नसोनी
विरह छेडु दे तुझीच गाणी !

जीवन जळू दे असेच रमणी
प्रतिभा फुलवुन कवनामधुनी
पतंग जळू दे ज्योति गिळोनी
विरह छेडु दे तुझीच गाणी !

कंठ दाटू दे तुझ्या स्मृतींनी
हृदय भरु दे तव प्रतिमांनी
दुःख जगू दे विरह पिऊनी
विरह छेडु दे तुझीच गाणी !

७–३–७३

# माझ्या माहेरच्या पोरी !

जागं जागं तू सासरी
माझ्या माहेरच्या पोरी !
आली मंडळी सोयरी
तुला न्यावया ग घरी ।।१।।

जड झाला का ग हार
मनी उठता काहूर ?
तुझा ओढाळ पदर
धरे माहेराचे दार ! ।।२।।

जड झाले का पाऊल
येता जाण्याची चाहूल ?
नाही आता, होती काल
तू गे माहेराची वेल ! ।।३।।

किती हुंदक्याच्या सरी
तुझ्या दाटल्या गं उरी !
तुझ्या आसवानी सारी
पहा भिजली पायरी ! ।।४।।

बघु नको मागे बाई
जरी उभ्या आई-ताई
मनी तापली कढई
येता सय ठायी ठायी ! ।।५।।

जरी रागावले कोणी
सासु नणंदाहि आणि
दाव साखरेची वाणी
शिंप गुलाबाचं पाणी ! ।।६।।

"सहा रिपूंचे गे सार
तया म्हणती संसार" !
जरी पाय काटचावर
तरी हास वरवर ! ।।७।।

तुझा पति भरदार
त्याचा दगडाचा ऊर !
आत वाहतो पाझर
त्याची माया तू पांघर! ।।८।।

बघ नेण्या आली "स्वारी"
ठेव माहेर माहेरी !
तुझ्या कापणाऱ्या करी
बांध सासरची दोरी ! ।।९।।

गाडी जाते दूर दूर
मागे रेंगाळे माहेर !
मनी मिटले काहूर
तुला नवी हुरहुर ! ! ।।१०।।

७-३-७३

# अधुरे गीत !

ओठात शब्द माझे ओठात आडले ना !
मी गीत गायिलेले अधुरेच राहिले ना ! धृ ॥

तू सांग वाहूं कोणा त्या मूक भावनांना
आवरूं कशी आसुंना निववून लोचनांना
तूं बांध घाल आता अधिऱ्या खुळ्या सुरांना

मी गीत गायिलेले अधुरेच राहिले ना ? ॥ १ ॥

तूं सांग चांदण्यांना गुंफावया सुरांना
ब्रह्मांड तोकडे रे उत्तुंग कल्पनांना !
तू थांब, छेड ताना भेदून फत्तरांना
मी गीत गायिलेले अधुरेच राहिले ना ? ॥ २ ॥

अधुरेच गीत माझे अधुरेच राहताना
जाऊ नकोस पुढती तुडवून भावनांना
हे शब्द सूर थकले हृदयास कोरताना
मी गीत गायिलेले अधुरेच राहिले ना ? ॥ ३ ॥

९-३-७३

# सृष्टी, तुझा सन्मान !

निळ्या सावळ्या अभ्रछतांतुन
जलधारा झरतात नभांतुन ! धृ ॥

अवनी गेली नकळत शहारुन
थरथरणाऱ्या हरित तृणांतुन !
बिजली पाहे क्षणभर चमकुन
वरूणाचे गुणगान प्रकाशुन ! ॥ १ ॥

अनिल धावतो वृक्षलतांतुन
गुलगुल गोष्टी फुलांस सांगुन
निर्झर धावे मोती उधळुन
सृष्टी, तुझा सन्मान नभांतुन ॥ २ ॥

सृष्टी ल्याली सुंदर कंकण
इंद्रधनूला करात बांधुन
भास्कर हसला कनक मुखांतुन
प्रतिभेला आव्हान नभांतुन ॥ ३ ॥

सृष्टि लाजली रवीस पाहुन
दडुन बैसली निळ्या दरीतुन
उन्नत उर वरि परी उफाळुन
गंधा ये उधळून गिरीतुन ! ॥ ४ ॥

१२-३-१९७३

# मिटा पापण्यांनों मुके आंसु प्याया

नको दु:ख माझे पुन्हा मी बघाया
मिटा पापण्यांनो मुके आसु प्याया ! धृ।।

कुठे धावते ही नदी जीवनाची ?
कथा चालली का मनाच्या व्यथेची ?
नको आस वेडी उद्याला जगाया !
मिटा पापण्यांनो मुके आसु प्याया ! ।।१।।

नको संपदा ती, नको कीर्ति काही
नको वासनेची जुनी लक्तरे ही,
कहाणि पुरे ही, पुरे मोहमाया !
मिटा पापण्यांनो मुके आसु प्याया ! ।।२।।

नको भास खोटा सुखाच्या जलाचा
जिथे मृग धावे खुळ्या या मनाचा !
अता लोचनांना सदा शान्तवाया
मिटा पापण्यांनो मुके आसु प्याया ! !

२९-३-७३

# चांदण्यांनी कां जमावे ?

लाजता तू लाडके गे चंद्रम्याने का हसावे ?
प्रीत बघण्या या पहाटे चांदण्यांनी का जमावे ? धृ ।।

गुंफता तुजला कराने
वेलीनि कां डोकवावे ?
चुंबता मी ओष्ट कळीने
या फुलांनि कां फुलावे ? ।। १ ।।

गीत तू जे गायिलेले
कोकिळेने आळवावे ?
सूर तू पण सांडलेले
निर्झराने का धरावे ? ।। २ ।।

एक होता श्वास अपुले
वायुने का घुटमळावे ?
प्रणयि मीलन चाललेले
क्षितिज बघण्या का झुकावे ! ।। ३ ।।

लाडके मज आज वाटे
प्रीतिला या पंख यावे !
उडून जावे दूर कोठे
जेथ जगहि हे नसावे !

११-४-७३

# सांग कधी येणार साजणा ?

नकळत माझ्या मागे येवुन
अलगद माझे झाकुन लोचन
मम स्कंधावर ठेवाया कर

सांग कधी येणार साजणा ?

दिवस विझतसे रात्र चेतवुन
पहाट जागे स्वप्ना उधळुन
तुज स्पर्शास्तव आसुसले जर

सांग कधी येणार साजणा ?

आठवणीच्या हिंदोळ्यावर
किती मनाला घालू आवर ?
कण कण जळते तुझी प्रिया जर

सांग कधी येणार साजणा ?

नटून कितीदा बघते दर्पण
निराश होते दारी येवून
जीवन तुजविण मृगजळ मज जर

सांग कधी येणार साजणा ?

८-९-१९७३

# घे तू हरिचे नाम !

गोविन्द ! गोविन्द !
घे मुखी गोविन्द !
घे तू हरिचे नाम ऽऽऽ ! धृ।।

मानव म्हणुनी जन्म एकदा,
विसरु नको तर तूं गोविन्दा !
सोड क्रोध तू काम ऽऽऽ ! ।।१।।

संसाराचा अवजड गाडा
ओढुन थकशिल होशिल वेडा !.
हरि खरा विश्राम ऽऽऽ ! ।।२।।

हरिनामाचा महिमा मोठा !
पावन होशिल नाम बोलता !
घे तर भगवत् नाम ऽऽऽ ! ।।३।।

२६-९-७३

# कारभारी !

कोंबडयाची बांग झाली
पाखरांना जाग आली,
जागि झाली सारी सारी !

तरि न आला ऽऽऽ, कारभारी !

डोंगराच्या डोलि मधुनी
सूर्य हंसला तोंड भरुनी,
उन्ह पिवळे येइ दारी

तरि न आला ऽऽऽ, कारभारी !

सूर्य डुबला दिवस पिउनी
सांज आली ज्योत तेवुनी,
दाटली उरी ओढ भारी,

तरि न आला ऽऽऽ, कारभारी !

आठवणिंना घेत पाठी
कंठु कैशी रात मोठी ?
खळ न डोळयां आज बाई !

तरि न आला ऽऽऽ, कारभारी !

१०–१२–१९७३

# कोल्याचि लेक मी चालले,
# चालले दर्या वरी !

कोल्याची लेक मी चालले, चालले दर्यावरी ।।धृ।।
कोली वाड्या मंदी सांगा, सांगा कोनी तरी ।।धृ।।

फेसाल पानी दुधावानी
उठतिल लाटा माडावानी !
टाकंन मी मचवा बाई, तरी पान्यावरी ।।१।।

अभांल टेकलयं दर्यावरी,
सुर्व्याची किरनं हंसल्यात वरी !
नारलि-पोफली झाडी, झाडी खाडीवरी ! ।।२।।

चम्चम् मासोली चांदीपरी
नाचल संमद्या पान्यावरी
टाक्न् मी, जालं बाई, माझ्या दर्यावरी ।।३।।

धावल मावरं सोन्यापरी
नेइन मी राशी माझ्या घरी,
गाइन मी गानी बाई, राघू मैनेपरी ।।४।।

लागतां मचवा बंदरावरी
मानसाचं मोहल फुटल तरी,
जाइन मी, लचकत् बाई, कोली वाड्यावरी ।।५।।

१२-१२-१९७३

## मन !

नको मना, नको मना
        दूर दूर फिरू !
जिथे तिथे भास सर्व
        नको नको झुरूं !
जिथें फूल गंध फळें
        उभा असे तरू,
तिथे तिथे भृंग, पक्षी,
        वळे वाटसरू !
न्याय असा जगताचा
        मोह नको धरूं !
ठेवि मनां स्थितप्रज्ञ
        तुझा तूच गुरु !
स्वर्ग-नर्क कल्पनाच
        मन हे पाखरू !
संकोचुन बैस पंख
        फुलव आत्म तरू ! !

२५-९-१९७७

# हिरवे गाणे !!

कुणी अनोखी नवथर तरुणी
छान रुपेरी पात्र घेवुनी,
उधळत बसली नभो अंगणी
जल बिंदूचे गुलाब पाणी !

क्षणा क्षणाला झरते झरणी
जिकडे तिकडे पाणिच पाणी !
पागोळ्यांच्या पद्न्यासातुनी
कुणी गुणगुणे टप्टप् गाणी !

व्याकुळलेली वेडी अवनी
श्रावणातल्या सरी पाहुनी
हर्ष भरानें म्हणते कानी
" गां वेलिंनो हिरवी गाणी ! "

अवखळ झाडे, अवखळ वेली
पारिजात अन् जाई सायली
तगरी बकुळी, बोगनवेली
फेर धराया सज्ज जाहली !

हंसरे वारे, हसरी पानें !
थर थरणारी हिरवी कुरणे !
गात बैसली एक मुखानें
श्रावण सरिचें हिरवे गाणे !

१३-१०-१९७१

# दर्शन दे तरी, दर्शन दे हरी ! !

तुझ्या दारी बघ एक भिकारी
तुझी झिजवितो रोज पायरी,
दर्शन दे तरी, दर्शन दे हरी ! धृ ॥
(कोरसः हरि ॐ हरि ॐ हरि ॐ ! हरि हरि ॐ ! !)

त्रैलोक्याचा तू हरि चालक !
चराचराचा तू हरि पालक !
दयार्णवा ये ! कुंजविहारी ॥ १ ॥
मोर मुकुट शिरी कटी पितांबर
राधाधिपती शामल सुंदर !
निळचा सावळचा ! ये गिरीधारी ! ॥ २ ॥

येइ मुकुंदा ! शिणली वाणी,
थकलें सूरही सरली गाणी
मिटो पापणी दर्शनि तव हरि ! ॥ ३ ॥

२३-४-७३

# प्रेयसीस विनंती !

तू उरी जखमा दिल्या जर तूच त्या बुजवून जा !
अंतरीची आग आणि तू सखे विझवून जा ! धृ ॥

जागतो मी जगताती चांदण्या ही अंबरी
जागतो बघ चंद्र वेडा, जागते अन् शर्वरी :
जागत्या जळत्या स्मृतिना दूर तू घेवून जा !
अंतरीची आग आणि तू सखे विझवून जा ॥ १ ॥

यायचे नव्हते पुन्हा तर का आली मम जीवनी ?
हासुनी लटके उगा अन् उडविली का पापणी ?
आसुसलेल्या आसवांना एकदा पाहून जा !
अंतरीची आग आणि तू सखे विझवून जा ॥ २ ॥

तो नको मज स्पर्श आगळा सावरीचा लाडके,
वासनेचा खेळ सगळा प्रणय म्हणजे ना धुके ?
प्रीतिचे निर्माल्य येथे ते तरी तुडवून जा !
अंतरीची आग आणि तू सखे विझवून जा ! ॥ ३ ॥

संपल्या आशा मनीच्या भंगल्या पण भावना
प्रीतिच्या सरल्या खुणाही राहिल्या कटू वेदना
जात असता अज्ञ जगि मी अश्रू तरि वाहून जा,
अंतरीची आग आणि तू सखे विझवून जा ! ॥ ४ ॥

६–८–७४

# प्रतिक्षा !

अजून भावना उरात
तुझेच गीत छेडतात !
अजून सूर या गळयात
तुझ्याच साठी आडतात ! धृ ।।

कितीक रश्मि शर्वरीत
तुझ्या स्मृतीच वेचतात
अजून चांदण्या नभात
तुझीच वाट पाहतात ! ।। १ ।।

मंद–धुंद आणि वात
शोधतो तुला बनात
अजून प्रीतिचा सुगंध
थांबतो खुळ्या फुलांत ! ।। २ ।।

कुठेस तू तुझीच प्रीत ?
मिळेल का पुन्हा जगात ?
अजून आंसू लोचनात
तुझ्याच साठी थांबतात ! ।। ३ ।।

६–२–१९७५

# शृंगार !!

शृंगार राजरस रंगिन रसिकासाठी
संगीत साजसह सजवुन आणिला भेटी !

अर्पितो असा हा अमृत घट घ्या ओठी
प्राशून तृप्त व्हा ! रसिक मंडळी मोठी !

कवि कालिदास अन् भुलले ह्या भवभूती !
राधेय राधिका रमले या रसकाठी !

ह्या रसात रमते वरूणी हरिणी रमणी !
ह्या रसात न्हाई निसर्ग मनुजा प्राणी !

शृंगार असा हा फुलवी प्रतिभा वाणी
शृंगार असा हा खुलवी कविता गाणी !

स्वर्गीय सांडता रस हा स्वर्गामधुनी
सेवून तृप्ताला " माधव वेडा " कोणी ! !

१३-२-१९७५

# हळूहळू टाक !

हळूहळू टाक । हळू ते पाऊल ।।धृ।।
लागली चाहूल । वार्धक्याची ।।धृ।।

पिकलासे मळा । तुझ्या डोईपण
डुगडुगे मान । सांभाळ सांभाळ ! ।।१।।

डोळे हे उजाड । गालांचे कोनाडं
कानांची भिताड । मंद मंद चाल ।।२।।

कापतात हात । कापतात पाय ।
कातडीची साय । लोंबते गबाळ ।।३।।

संसार असार । नको धरू फार
पैलतिरा वर । विठूचे राऊळ ! ।।४।।

वेड्या माधवाचे । ऐक बारे आता
विठू नाम घेता । उचल पाऊल ।।५।।

२९-८-७५

# देवा तुझे नाम चांगले चांगले !

देवा तुझे नाम । चांगले चांगले !
भरुनी राहिले । अंतरी माझ्या ।।धृ।।

तुझ्या नामे तुका । वैकुंठासी गेला
ज्ञानदेव झाला । ज्ञानरूप ।।१।।

नाम घेता नामा । नामरूप झाला
सेना चोखा गेला । तुझे पायी ।।२।।

पुंडलिका भेटी । नाम आणि तुला
नामे मुक्त केली । मुक्ताईला ।।३।।

वेडया माधवाची । ऐका एक वाणी
पापा लावा झणी । नामाची गाळणी ।।४।।

३०-८-७५

# मातीचे पुतळे !

मातीचे पुतळे । मातीतच जाणे
नको सजविणे । देहा लागी ।।धृ।।

मातीचे शरीर । मातीचा संसार
मातीचे घरदार । मातीमध्ये जाणे ।।१।।

आत्मा अविनाशी । आत्मा सर्व स्पर्शी
बोलवी चालवी । मातीचे खेळणे ।।२।।

नको धरू लोभ । मातीचा तूं कण
व्यर्थ आत्म्याविण । माझे मी तू पण ।।३।।

वेड्या माधवाचे । ऐक बा सांगणे ।
मनी फुलवी तूं । आत्म्याचें चांदणे ! ।।४।।

३०-८-१९७५

# ओठामधले गीत टिपाया !

नको भावना उफाळण्याया
नकोच प्रतिभा उत्कट व्हाया,
नको नको ते शब्द सुचाया
ओठामधले गीत टिपाया ! ।।धृ।।

नको मना तूं होवुस भावुक,
छेडुन वीणा हृदिची नाजुक,
नको सुरांची रंगिन किमया
ओठामधले गीत टिपाया ! ।।१।।

नको मना तूं फिरूस वणवण,
पिऊन आंसू नकळत कणकण,
नको नाद अन् प्रास जुळाया
ओठामधले गीत टिपाया ! ।।२।।

मनां शान्त हो ! स्थीर बनाया !
मानस सरसी 'चंद्र' बघाया !
चिद् आत्म्याचें संगीत गाया
अनंतातले गीत टिपाया !!!

१९-९-१९७५

# बक्षीस !

समजावयास आलो, समजून मात्र चुकलो,
मोती म्हणून नुसते आंसू धरून बसलो ! ।।धृ ।।
केला गुन्हा जरी मी देवून प्रेम आपुले
दाता म्हणून कां गे हे प्रायश्चित्त आगळे !
तरिही तुझ्याच दारी भिक्षेस आज आलो
मोती म्हणून नुसते आंसू धरून बसलो ।।१।।

वेडा म्हणून मजला हंसतात लोक सगळे
टोचून बोलताती किती सभ्य आणि बगळें !
जखमा उरी धरोनी परिही इथेच आलो !
मोती म्हणून नुसते आंसू धरून बसलो ।।२।।

हंसलीस तुच्छतेने फिरवून मान आपुली
कळ एक वेदनेची हृदयांत खोल घुसली !
जळता जिवंत असुनी मरणास नाहीं भ्यालो !
मोती म्हणून नुसते आंसू धरून बसलो ! ।।३।।

रचतोय दोन ओळी येथेच एकला मी !
सौख्यात लोळ जा तूं ! जरि मी इथे निकामी !
ठरवेल काळ पुढती मी जिंकलो न हरलो !
मोती म्हणून नुसते आंसू धरून बसलो ! ।।४।।

२२-९-१९७५

# काय पुसता मला सारखे !

काय पुसता मला सारखे,
" काय पाहिजे ? काय पाहिजे ?"
माझं गांव माझी माणसे
मनासारखं मला पाहिजे ! ॥१॥

नको मला फ्लॅट बंगले
सिमेंटमधले नुसते ठोकळे !
नको मला बांधिल जीणे
शहरामधल्या खुराड्यातले ! ॥२॥

मला पाहिजे जीवन सगळे
खेड्याकडिल मोकळे ढाकळे !
सारवलेल्या घरामधले
ऐस-पैस शेतामधले ! ॥३॥

नको मला मार्ग मोठे
डांबरी रस्ते रुक्ष पट्टे !
जेथे गाड्या-घोडे-माणसे
गर्दी नुसती ओढत नेते ! ॥४॥

मला हव्यात वाकड्या तिकड्या
अवखळ आगळ्या पाऊल वाटा !
जेथे वारा कोरत बसतो
हरळीवरती हिरव्या लाटा ! ॥५॥

नको मला सभ्य बगळे
माणुसकीला अंतरलेले,
चेहरे कृत्रिम अर्धमेले
हृदयामधून अक्रसलेले ! ॥६॥

मला चालतिल खेडूत बावळे
माणुकीने मंतरलेले !
मला पाहिजेत चेहरे वेगळे
जीवनासाठी आसुसलेले ! ॥७॥

उगीच मजला दाखवू नका
रंगवलेल्या बेगडी वायका !
सौंदर्याला अंचवलेल्या
कृत्रिम हसऱ्या प्लॅस्टिक नाइका ॥८॥

मला पाहिजे बाइल वेगळी
सरळ सुंदर खेडचा कडली !
जिला पाहून नकळत हंसतात
पाणवठचाला उन्हे कोवळी ! ॥९॥

मंजुळ डोंगर निर्झर झाडी
किलबिलणारी छोटी खेडी
मला पाहिजे सृष्टी वेडी,
नेसत आसता हिरवी साडी ! ॥१०॥

सौंदर्याचा मी पुजारी !
विषण्ण होतो तुमच्या शहरी
म्हणून म्हणतो एक सारखे
काय पुसता काय पाहिजे ? ? ॥११॥

३१-१०-१९७५

# कलिकेची विनंती !

मी गंध दिला जर तुज भ्रमरा
या पाकळीत तूं थांब जरा ! ।।धृ।।
पराग माझे फिरले वणवण
तुला शोधण्या फुला फुलांतुन !
तुला पाहता खिळल्या नजरा
या पाकळीत तूं थांब जरा ! ।।१।।

शुक्राचा बघ पहाट तारा
वरून सांडतो अमृत धारा !
दंबबिंदू मी धरला अधरा
या पाकळीत तूं थांब जरा ! ।।२।।

किती विनवु मी भृंग पाखरा ?
कोमल स्पर्शा तुनी प्रियकरा ?
शहारताना अंग मधुकरा
या पाकळीत तूं थांब जरा ! ।।३।।

कोमेजुन हे जाइल जीवन
निघुनी जाता तूं कलिकेतुन !
क्षण मिलनाचा असता अधुरा
या पाकळीत तूं थांब जरा ! ।।४।।

१-११-१९७५

# झोका !!

मागे झाडे, पुढे झाडे, झाडांचेचं कडे !
मैत्रिणिनो झोके घेऊ उंच उंच गडे ! ।।धृ।।

झाडांना गं बांधलेत फुलांचेच घडे
वाऱ्यावर सांडतिल सुगंधाचे सडे,
सौरभात न्हात जाऊ, जाऊ पुढे पुढे--
मैत्रिणिंनो झोके घेऊ उंच उंच गडे ! ।।१।।

रेटतोय मागे मागे खटयाळ हा वारा
डोलवि हा जरि बाई झाडांचा पिसारा !
नका भिऊ मुळी त्याला पाडू त्यास तडे !
मैत्रिणिनो झोके घेऊ उंच उंच गडे ! ।।२।।

आभाळास उमटवुया पायांचा गं ठसा !
स्वर्गालाही पोहचवुया धरणीचा वसा,
आनंदात गात जाऊ उंच उंच पुढे--
मैत्रिणिनो झोके घेऊ उंच उंच गडे ! ।।३।।

झोक्यासंगे डोलतिल डोंगराचे कडे
डोंगराचे कडे बाई शेते आणि झाडे !
सुखाला गं येइल भोवळ थांबा थोडे थोडे--
मैत्रिणिंनो झोके घेऊ उंच उंच गडे ।।४।।

२१-१२-१९७५

# शाम सखे मज दिसला नाही

रातजळे ! जळतेय उरी मी !
शाम सखे मज दिसला नाही ! ।।धृ।।

स्वप्न उषाशी घेवुन निजते,
स्वप्नातहि मी शाम शोधते
आसु आसुतुन शाम जपे मी !
शाम सखे मज दिसला नाही ! ।।१।।

गोप गुरे झुरतात सख्या ही,
खिन्न दिशा ! अन् स्तब्ध नदीही,
शाम विना त्रैलोक्य रितेही
शाम सखे मज दिसला नाही ! ।।२।।

निशीदिनी केवळ शाम शोधते
शोधुन गोकुळ उन्मन होते,
श्वासहि माझा शाम जपेही
शाम सखे मज दिसला नाही ।।३।।

५-१-७६

# भ्रमाचा भोपळा !

माझी पोरे, माझी बाइल, बाप आणखी आईना,
माझी वाडी, गाडी शेते, अवघे येथे राहिल ना !
माझे सगळे, माझे म्हणुनी कशांस कवळू सांगाना ?
माझे माझे म्हणता म्हणता, प्राण एकटे पळतिल ना? ।।१।।

कोण कुणाचे सांगा जन हो ? योगायोगे मिळतो ना !
काय कुणाचे जाते सांगा सरणावरती चढताना ?
थोडचा वेळे पुरते आसू हासू पण ही नकली ना ?
माझे माझे म्हणता म्हणता प्राण एकटे पळतिल ना? ।।२।।

भ्रमा भोवती फिरत राहणे, जीवन म्हणजे भ्रम मोठा !
जन्म-मृत्युच्या तटात फिरती मायावी सगळचा वाटा !
कळता वळता उलटे पळता जीवन अवघे सरतेना !
माझे माझे म्हणता म्हणता प्राण एकटे पळतिल ना? ।।३।।

१०-१-१९७६

# हितोपदेश !

जीवनाला अर्थ आहे
व्यर्थ ते समजू नका !
पुष्प सानहि गंध देते
तुच्छते लेखू नका ! ॥१॥

काळ आहे पळत पुढती
वेळ तो दवडू नका !
क्षणहि फिरवे काळचाती
अल्प त्या मानू नका ! ॥१॥

भावनेचा मान राखा
भावना तुडवू नका !
आसवांना आस असते
फोल त्या समजू नका ! ॥३॥

करित जा कर्तव्य आपुले
रुक्षजरि टाळू नका !
फोडते गिरी थेंब नभिचे
सत्य हे विसरु नका ! ॥४॥

३–२–७६

# हेटाळणी !

संपलो जरि मी जगी या
काव्य राहिल दर्पणी !
दर्पणी हृदयी जनांच्या
आसवाया पापणी !

पापणी भिजली जरी ना
काव्य माझे पाहुनी !
अक्षरे म्हणतील त्यांना
व्यर्थ शिकला जीवनी !

सज्जनांनो थांबवाना
हास्य ते हेटाळणी !
काव्य कळते कविमनांना
रसिकता ज्यांच्या मनी !

जाऊ द्या ! सांगू कशाला
रोजची ही काहणी !
मीच हसतो, मीच रडतो
काव्य माझे पाहुनी ! !

५-२-७६



# मुरली !!

ह्याची आवरा गं बाई कुणी मुरली
ह्या मुरलीस राधाऽऽजर भुलली ! ।।धृ०।।

हा शाम सुरांचा राजा
घेईल ठाव हृदयाचा !
गाई-गुरेंहि ह्याला जर भुलली ! ।।१।।

रस गंध नादमय मुरली !
प्रति किमया स्वर्गामधली !
ह्या मुरलीनें सृष्टी भारवली ।।२।।

हे वेड सुरांचे सगळे
हरिनेच जगा लावियले !
ही मुरली स्फुरली मनी भरली ।।३।।

१६–४–७६

# टिपरी !

टिपऱ्यांचा खेळ खेळू, टिपऱ्यांचा खेळ !
चांदण्यात फेर धरू, अमृत ही वेळ ! ।।धृ०।।

भरलेल्या गोकुळात गोप आणि गोपी,
नंदाचत्र्या अंगणात फुलवुया ग राती !
आनंदात सर्व दंग हासते आभाळ !
चांदण्यात फेर धरू, अमृत ही वेळ ! ।।१।।

जिथे कृष्ण राधिकाहि बासरिचा नाद,
तिथे तिथे फेर धरा साजणिंनो आज,
गौर राधिकेत धुंद यशोदेचा बाळ !
चांदण्यात फेर धरू, अमृत ही वेळ ! ।।२।।

टि्प् टि्प्त्या टिपरीने टिपूया आनंद
कि्ण् किण्त्या पैंजणात बोलवू मुकुंद !
एक रुप ! एक भाव ! तिथे नंदलाल !
चांदण्यात फेर धरू, अमृत ही वेळ ! ।।३।।

१८-४-७६

# क्रांती ज्वाला !

यज्ञकुंड हा कुणी मांडला अग्नीदेवाचा !
छे हो ! हा तर डोंब उसळला क्रांतिज्वालेचा !! ॥ धृ० ॥

हुकुमशहांच्या थडग्यावरती बांधियली ही वेदी,
रक्ताश्रुंच्या शेणाने पण सारविली ही आधी !
समिधा येथे पहा आणल्या सत्ताधिशांच्या
राशी येथे पहा लागल्या राजा-राण्यांच्या !
यज्ञ नसे हा वणवा मोठा दलितांच्या क्रोधाचा
छे हो ! हा तर डोंब उसळला क्रांतिज्वालेचा ! ॥१॥

धनिकांचा तो काळा पैसा इथेच जळणार
खोटया इस्टेटिंच्या ठिणग्या इथेच उडणार !
वित्तपिपासू प्रवृत्ती ह्या इथेच सरणार !
सरणासरणावरूनी ज्वाला पुन्हा पेटणार !
प्रताप केवळ हा आगीचा दलितांच्या हृदयीचा
छे हो ! हा तर डोंब उसळला क्रांतिज्वालेचा ॥२॥

ह्या वेदीला आहे वावडे निष्क्रिय शांतीचे
ह्या यज्ञाशी आहे वाकडे दांभिक लोकांचे !
खोटी प्रतिष्ठा, असत्य गाथा इथे न टिकणार
आत्मस्तुतीचे स्वार्थि नगारे इथेच फुटणार !
ह्या वन्हीने रंग बदलला निळया आभाळाचा
छे हो ! हा तर डोंब उसळला क्रांतिज्वालेचा ! ॥३॥

या यज्ञातुन विशुद्ध सीता पुढती येणार !
असत्यतेच्या राखेमधुनी सत्य उमलणार !
या यज्ञाच्या निखाऱ्यातुनी जीवन फुलणार
मानवतेचा अंकुर हिरवा पुन्हा उगवणार !
खेळ चालला हा तर नुसता क्रांती-शांतीचा !
छे हो ! हा तर डोंब उसळला क्रांतिज्वालेचा ! ।।४।।

१६-५-७६

## खन्त !

मुकी बिचारी कुणी हाकावी,
आम्ही लेकरे जन्मा यावी !
"त्यापेक्षा तूं भारत भूमी, आम्हा वाचुनि वांझ असावी"! ।।धु०।।

लोकशाहिच्या तिरडीवरुनी
माणुसकीची प्रेते जावी !
न्यायदेवता पळता भिऊनी
हुकुमशाही तिज विकट हंसावी ! ।।१।।

निर्बुद्धांची चलती व्हावी,
विद्वानांची कदर नसावी,
ऋजुता-ममता, नीति-चारुता
अनीति पुढती काय नमावी ? ॥२॥

सहनशीलता जरी संपली
तरी शिथिलता गात्रि भरावी !
कोटी कोटी पोरामधुनी
एकालाही चीड नसावी ? ॥३॥

जात्यामधली ताटामधली
एकामेका उगिच हंसावी
भरडत असता अवघी सगळी
प्रतिकाराची ओढ नसावी ! ॥४॥

मुकी मेंढरे मुकी मरावी !
तरी अस्मिता उरी नसावी !
अन्यायाच्या राशी मधुनी
मुर्दाडापरि जन्मा यावी ! ॥५॥

४-६-१९७६

# पहिला पाऊस

निळ्या अंगणी खेळ चालला
ग्रिष्मामागुन मेघ धावला
त्या मेघाला पकडायाला
झाडी मधला वारा पळला

धावुन धावुन सारे दमले
घामाने अन् चिंब जाहले !
मेघामधुनी थेंब सानुले
मातिस काळ्या मिळण्या आले!

त्या मातीला वरुणावरले
थेंबामधुनी प्रेम उमगले !
त्या प्रेमाचे कोंब कोवळे
गंध घेवूनि वर डोकवले !

अंकुरलेली प्रीती पाहुन
धरणी गेली आणि हुरळुन !
हिरव्या हिरव्या अंगागातुन
वरुण बिलगला प्रीती शिंपुन !

उधाण आले मग प्रीतीला
अवनी कवळे झणि वरुणाला
संतत धारेमधुनी आगळा
चैतन्याचा ओहळ आला !

पर्जन्यानें सृष्टी फुलली
फुला फळातुन गोड हासली !
किलबिलकिलबिल इवली इवली
घरट्यामधुनी पिलें लाजली !

पहिला वहिला गेला येवुन
नवाळ पाऊस आनंद विखरुन !
इंद्रधनुच्या दरवाजातुन
देवहि हंसला सूर्यरथातुन !

छोटे मोठे खुलले फुलले !
पावसामध्ये आणि नाचले !
प्रतिभेची मग कळी कोवळी
कविच्या मनी हि झणि टवटवली

१२-६-७६

# नर्तकी !

छनन्न छुम्छुम, छनन्न छुम्छुम, नाच नाच नर्तकी
गिरकी फिरकी मध्ये फिरव तूं नाद सखे सारखी ! ।।ध्रृ०।।

त्या नादाने भारवून तूं टाक रसिक ही मने
मनामनातुन, जनाजनातुन घुंगुर मग रुणझुणे !
चंद्रासम हा मुखडा तुकडा उडव भृगुटी नाकही
गिरकी फिरकी मध्ये फिरव तूं नाद सखे सारखी ! ।।१।।

गरगर, भरभर, पडतिल पद ते पदामागुती पदे
तकतक, थयथय, बोल ठाकतिल आणि सुरांचे घडे !
अलगद नकळत चमकुन जाइल, वीज नयनी आणखी
गिरकी फिरकी मध्ये फिरव तूं नाद सखे सारखी ! ।।२।।

सळसळ नागिण केसांची तव फिरेल गे चहुकडे,
फुले मोगरी फिरतिल गजरे शिपुन सौरभ सडे !
तालसुरांची सुंदर किमया झडेल मग छानशी
गिरकी फिरकीमध्ये फिरव तूं नाद सखे सारखी ! ।।३।।

अनिल सलिलसम, द्रुतलय वृतलय हलव सिंहसम कटी
कटिकटि, पदपटी, चपल पडूं दे पदन्यास तव अती !
मृणमय तृणमय. नश्वर तनुही अर्पि प्रभुच्या पदी
गिरकी फिरकीमध्ये फिरव तूं नाद सखे सारखी ! ।।४।।

१०–७–७६

# रिता किनारा !

शोधून सापडेना मजला मुळी सहारा !
प्रीये ! तुझ्या विना हा सारा रिता किनारा ! ।।धृ०।।

प्राजक्त चांदण्याचा फुलला जरी आभाळी
झुकवून शुक्र तारा वरूनी क्षितीज भाली !
वाळूत सांडताना म्हणतात अश्रू धारा
प्रीये ! तुझ्या विना हा सारा रिता किनारा ! ।।२।।

सामोरी सागराच्या दिसता अनंत लाटा,
मागून माड केळी, हिरव्या प्रसन्न वाटा,
अंगास झोंबणारा सांगे पहाट वारा
प्रीये ! तुझ्या विना हा सारा रिता किनारा ! ।।२।।

येवून नित्य जाती ते चंद्र सूर्य तारे,
फुलवून भावनांचे माझ्या हृदी निखारे !
किलबील पाखरांची परि दे मला इशारा
प्रीये ! तुझ्या विना हा सारा रिता किनारा ! ।।३।।

वेळी तसा अवेळी येवून एकला मी
शुन्यांत मोजतो त्या लाटा किती अनामी,
लिहीताहि दोन ओळी म्हणतो तुला बिचारा
प्रीये ! तुझ्या विना हा सारा रिता किनारा ! ।।४।।

११-७-१९७६

# चिमण्याची आळवणी

लागले मम बोल म्हणुनी नेत्र कां पाणावले ?
नीज कां तुज आज नाही, फूल हे कोमेजले ? ॥धृ०॥

निजवुनी वातीत ज्योति, रात्र ही पेंगूळली
सानुली घरट्यात बाळे चिउसवे बघ पहूडली,
झोपला ' भोभो ' नि ' माऊ ' झोपली सारी मुले
नीज कां तुज आज नाहीं, फूल हे कोमेजले ? ॥१॥

दुमडल्या ओठात नाजुक दुःख तुजला कोणते ?
कोणत्या चिंतेत तूं तर भय " बुवाचे ' वाटते ?
दृष्ट कां बाळास झाली हास्य तेजहि लोपले !
नीज कां तुज आज नाही, फूल हे कोमजले ? ॥२॥

नारळीच्या झावळीला तो विसावे चंद्रमा
मेघ दुलईतून दडल्या चिमुकल्याहि चांदण्या !
जागता तूं जागते मी चित्त मम कां जागले ?
नीज कां तुज आज नाही फूल हे कोमेजले ! ॥३॥

२५-७-७६

# पहाटेचा शहारा !

(गझल)

रंगल्या प्रितीस माझ्या उधळुनी गेलास तूं !
या पहाटेच्या शहाऱ्या मी कशी पण आडवू ? ।।धृ०।।

आजही वेढून आले आस वेडी कालची,
माळुनी मी स्वप्नमाला थांबले तव उर्वशी !
सायलीच्या धुंद गंधा मी कशी नाही म्हणू ?
या पहाटेच्या शहाऱ्या मी कशी पण आडवू ? ।।१।।

ह्या धुक्यातिल पायवाटा वाट आपुली पाहती,
हरळीची दंव बिंदू बाळे प्रणय अपुला सांगती !
गुंजणाऱ्या पाखरांना मी कशी पण थांबवू ?
या पहाटेच्या शहाऱ्या मी कशी पण आडवू ? ।।२।।

चंदनी तारुण्य माझे कां जळावे रे फुका ?
मी तुझी असता प्रियाही पारखी साऱ्या सुखा !
लोटलेल्या आसवांना मी कशी पण थोपवू ?
या पहाटेच्या शहाऱ्या मी कशी पण आडवू ? ।।३।।

२५–७–७६

# कै. वि. स. खांडेकर यांना मृत्यूची श्रद्धांजली

मृत्यु म्हणाला, इंद्रा इंद्रा ! उघड तुझे ते दार !
पृथ्वीचा बघ सुपुत्र आणला करण्यास्तव सत्कार !

ह्याच्या हृदयी माणुसकीची फुलली ‘अमृतवेल’,
शाश्वत मूल्ये ह्याच्या ठायी दिसली आणि विशाल !
हाच ‘ययाती’ ‘कांचनमृग’ हा विष्णूचा अवतार !
पृथ्वीचा बघ सुपुत्र आणला करण्यास्तव सत्कार ! ॥१॥

साहित्याचा शिरोमणी हा सरस्वतीचा लेक,
ह्याच्यावरुनी ओवाळावे लाखो ‘नंदादीप’ !
कुबेर थकला पहाता ह्याचे प्रतिभा रत्नागार,
पृथ्वीचा बघ सुपुत्र आणला करण्यास्तव सत्कार ! ॥२॥

दिव्यात्मा हा इथे आला तर भरवा मग दरबार
देवदेविंनो, उधळा यावर नवरत्नांचे हार !
मरणानेही अमर जाहला लेखक जगी हा थोर,
पृथ्वीचा बघ सुपुत्र आणला करण्यास्तव सत्कार ! ॥३॥

३-९-७६

# जवळ ये प्रणयिनी !

ही रात्र सुखद चांदणी ! फुललीय नभो अंगणी !
वेढून प्रीत साजणी जवळ ये, आज जरा प्रणयिनी ! ।।धृ०।।

तो गंध मंद दरवळे ! वकुळीस पहा बिलगुनी !
तो पवन धुक्यातुन पळे ! डुलवून मृदल कमलिनी !
ह्या अशा धुंद तरि क्षणी छेड तूं गीत पुन्हा कामिनी ! ।।१।।

किती हंस हंसी जल तळीं, बघ प्रणय रंगी रंगली !
ती विहग युगुल चिमुकली, घरट्यात पहा दंगली,
ह्या मदन मस्त तरिक्षणी जवळ ये ! प्रिये जरा लाजुनी ! ।।२।।

रस गंध रूप स्पर्शुनी तव मुर्ति ठाकली मनी !
स्वप्नास लगडल्या किती ! त्या प्रणयाच्या आठवणी !
बाहूत श्वास मिसळून विसरु दे ! आज जगा साजणी ! ।।३।।

२४-११-७६

# गीत हे उमलून दे !

ये आनंदा, ये मुकुंदा ! गीत हे उमलून दे !
शामवेड्या राधिकेचे भाव तूं गुंफून दे ।।ध्रृ।।

तूच प्रतिभा, तूंच प्रतिमा ! प्राण ही गीतातले !
शब्द तूं पण, अर्थ तूही ! गूढहि चित्तातले !
तूंच कंठी, तूच हृदयी जाण हे शब्दातले !
शामवेड्या राधिकेचे भाव तूं गुंफून दे ! ।।१।।

जाणुनी पण नेणता तूं गोकुळी मी शोधते
शोधताना माधवा तुज गीत माझे सांडते !
बासरीचे सूर तुझिया गीत माझे होवू दे !
शामवेड्या राधिकेचे भाव तूं गुंफून दे ! ।।२।।

तूं न येथे मी न येथे, स्वप्न झाले का खुळे !
एकरुपी एक होता गीत माझे गुंफले !
गीत माझे तूच केले तेच मजला भोगू दे !
शामवेड्या राधिकेचे भाव तूं गुंफून दे ! ।।३।।

१८-२-१९७७

# भास !

हासतोय कान्हा भासे मनीच्या अंगणी !
पैंजणात राधा माझ्या नाचतेय कोणी ! ॥धृ०॥

सूर बासरीचा कानी येतसे कुठून ?
नाचतात आणि गौळणी चित्तही भरून !
भान काय हरपुन नेले आज श्रीहरींनी ?
पैंजणात राधा माझ्या नाचतेय कोणी ! ॥१॥

पावलात विजली चमके ऊर ये भरून,
ठायीठायी शामल दिसतो गिरकिच्या आडून !
स्वप्न राधिकेचे विणले आज घुंगरांनी !
पैंजणात राधा माझ्या नाचतेय कोणी ! ॥२॥

जिथे तिथे गोकुळ दिसते काय करू आता ?
तूंच राधिके मज दावी सर्व कृष्ण वाटा !
मुक्त धन्य मीही राधे ! प्रभूच्या कृपेनी !
पैंजणात राधा माझ्या नाचतेय कोणी ! ॥३॥

१९-४-७७

# जीवनाचे धागे !

अंधार आज पुढती अंधार आणि मागे !
विणतोय जीवनाचे तरि मी उगाच धागे ।।ध्रृ०।।

येथे कुणी न माझा मीही नसे कुणाचा
हा मायाजाल खोटा नसतो कुणी कुणाचा !
जातो कुठें न कळता मी चाललोय वेगे !
विणतोय जीवनाचे तरि मी उगाच धागे ! ।।१।।

नैराश्य जीवनाचे गिळतो आंसूत कितिदा !
हासवून हासतोही खुलतो आतून सुकता !
झुळका कधी सुखाच्या देती मनास झोके !
विणतोय जीवनाचे तरि मी उगाच धागे ! ।।२।।

थकलो विणून धागे वर्षा आणि दिसांचे,
नियती धरुन बसली हे वस्त्र जीवनाचे !
अधुरी अनंत स्वप्ने ठेवून रोज मागे,
विणतोय जीवनाचे तरि मी उगाच धागे ! ।।३।।

२४-५-१९७७

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# खुळ्याची मागणी

कोवळ्या जाई कळ्यांनो वेलिला उमलू नका !
याद प्रीयेची दिवाणी जागवू जगवू नका ! ॥धृ०॥

गंध तुमचा धुन्द भारी जागवे प्रीती खुळी,
भावना उमले उफाळुन उमलताना पाकळी,
सौरभाने अंतरीच्या आठवणी उजळू नका !
याद प्रीयेची दिवाणी जागवू जगवू नका ! ॥१॥

आज आसती ती प्रिया तर माळले असते शिरी,
कुंतलाच्या रेशमातुन पहुडला असता तरी !
रात्र ही आहे विराणी यातना देवू नका !
याद प्रीयेची दिवाणी जागवू जगवू नका ! ॥२॥

संपलो जर मी दिवाणा देह माझा ठेवूनी
झाकुनी मज घ्याल कां गे संपवाया बोचणी ?
पोळलेल्या ह्या खुळ्याला डागणी देवू नका !
याद प्रीयेची दिवाणी जागवू जगवू नका ! ॥३॥

१५-६-७७

# मयूर नर्तन !

नाच मोरा, नाच मोरा ! नाच तू माझ्यापुढे !
नृत्य तालांचेच मजला नर्तनातुन दे धडे ! ॥ धृ० ॥

सुखद शुभदा किरण कितिदा कनक रंगा उधळती,
विहग माला फेर धरुनी मधुर शुक रव बोलती !
अंबरी तो मेघ नाचे, अनिल नाचे चहुकडे
नृत्य तालांचेच मजला नर्तनातुन दे धडे ! ॥१॥

धवल विमला स्फटिक धारा अभ्र तनुतुन सांडती,
दडद् दिड्दा वरुण वरुनी ताल तुजमज दाविती !
सलिल नाचे निर्झरातुन रुणझुणूनी तुजकडे !
नृत्य तालांचेच मजला नर्तनातुन दे धडे ! ॥२॥

नृत्य तव हे रे मयूरा भान माझे हरपती !
नाद लयिचे मोर दुसरे कल्पनेतच धावती;
म्हणुनि मज बेहोश होण्या नाच तूं माझ्यापुढे !
नृत्य तालांचेच मजला नर्तनातुन दे धडे ! ॥३॥

९-७-१९७७

# मी कवी होणार आहे !

अंबराला छेदणारे,
सागराला कवळणारे
दशदिशांना व्यापणारे,
काव्य मी करणार आहे, मी कवी होणार आहे !

पालवीला हसविणारे
पाकळीला फुलविणारे
गुंजणाऱ्या पाखरांचे
काव्य मी करणार आहे, मी कवी होणार आहे !

चांदण्यांना झेलणारे
चंद्रबिंबा सजविणारे
अप्सरांना रिझविणारे
काव्य मी करणार आहे, मी कवी होणार आहे !

दलित दुःखे जाणणारे
रक्त अश्रू भिजविणारे
झोपडीतिल भावनांचे
काव्य मी करणार आहे, मी कवी होणार आहे !

भावनांनी नाहलेले
नवरसांनी रंगलेले
अंतरीच्या निर्झराचे
काव्य मी करणार आहे, मी कवी होणार आहे !

१८-७-१९७७

# निसर्गा तूच खरा ईश्वर !

निळे जांभळे असीम डोंगर !
त्यावर लोंबे सुवर्ण झुंबर
गुलाब पसरुन निळ्या शालिवर
बसला जो सुंदर

निसर्गा तूच खरा ईश्वर !

हिरवे हिरवे पाचू विखरुन
निर्झर सागर अनुपम गुंफुन
मयुर पिसारे झाडीत डुलवुन
प्रगटे जो भूवर !

निसर्गा तूच खरा ईश्वर ! !

चंद्र चांदण्या ग्रहगोलातुन,
कधि मेघातुन, कधि बिजलीतुन,
जो डोकावे विराट होउन
विश्वरुप श्रीधर

निसर्गा तूच खरा ईश्वर ! !

सगुण निर्गुणी चराचरातुन
अणुरेणुतुन, जनहृदयातुन
फळा फुलातुन रसगंधातुन
भरला सर्वेश्वर ! !

निसर्गा तूच खरा ईश्वर ! !

'नेतिनेति' ज्या शास्त्रे म्हणती
नास्तिक आस्तिक अवाक होती !
संत महात्मे भाविक भजती,
जोडुन आपुले कर !

निसर्गा तूंच खरा ईश्वर !

२४-८-१९७७



# माझ्या खुळ्या सुरांनो !

माझ्या खुळ्या सुरांनो ! थांबा गळ्यात गाता
मिळणार ना कुणाची तुम्हास दाद आता ! ॥ धृ०॥

शब्दास सान माझ्या तुम्हीच दर्द देता,
भिजवून भावनाही फिरूनी गळ्यात येता !
कंठात काळजाच्या आणिता कशास लाटा ?
मिळणार नां कुणाची तुम्हांस दाद आता ! ॥१॥

आसवात अंतरीच्या तुटती जरीहि तारा,
'एकाकी जीवनाला संगीत रे सहारा !'
नाही जरी मी म्हणता परि कां गळ्यात येता ?
मिळणार ना कुणाची तुम्हांस दाद आता ! ॥२॥

मीही जसाच वेडा तुम्हीही सात वेडे !
जळताही सुंभ सगळें उरती तसेच वेढे !
जावूच साथ सारे बुजताच इष्क वाटा,
मिळणार नां कुणाची तुम्हास दाद आता ! ॥३॥

१३-१२-७५.

# संपत आली वात !

जळता जळता संपत जाणे जीवन ज्या म्हणतात !
जळू नको तर ज्योति आता, संपत आली वात ! ॥धृ०॥

तेजाची तू जरी पाकळी,
सौंदर्याची मूर्त सानुली,
काळरुप ही कृष्ण काजळी आली पाठोपाठ !
जळू नको तर ज्योति आता, संपत आली वात ! ॥१॥

जीवन म्हणजे चटके घेणे !
जीवन म्हणजे चटके देणे !
पोळुन पोळुन अंति करपणे, पुरते काठोकाठ !
जळू नको तर ज्योति आता, संपत आली वात ! ॥२॥

कळायचे पण तुजला नाही !
सुखदुःखाची गूढ गढी ही !
अंधारावर झोकुन जाणे जिणे तया म्हणतात ! ॥३॥

१३-८-७७.

# रम्य पहाट !

(कवीच्या मृत्यूनंतर त्याच्या प्रेताभोवती जमलेल्या लोकांना बघून कवीचा आत्मा म्हणतो)

नका करू ती मजवर कोणी अश्रूंची बरसात !
आज पाहतो मृत्यू पुढची सुंदर रम्य पहाट ! ॥धृ०॥
नकोच मजला शेज फुलांची,
फुले साहली उपहासाची,
शृंगाराच्या पलीकडे मी ! नकाच फिरवू हात ! ॥१॥
अश्रू तुमचे अश्रुच उरतिल,
अश्रुहि माझे काव्यच ठरतिल,
प्रतिभा हृदिची देइल मजला शब्दा विनही साथ ! ॥२॥
सरणावरती सरते प्रीती,
आत्म्याविनही केवळ माती !
काल हवासा होतो जर मी, कसे फिरविता पाठ ? ॥३॥
अता न येथे कोणी जवळी !
दुरुन पाहतो गम्मत सगळी !
जन्मभरी मज हंसला तुम्ही, मीच अता हसणार ! ॥४॥

१६-८-७७

REFBK-0022334
REFBK-0022334
ग्रंथालय ठाणे
22334
काव्य
2375
(स्थळ प्रत)